नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ३८ * * नागपूर * | बुधवार, दिनांक ७ मे २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## पंजाबमधील जंगलातून हँडग्रेनेड जप्त

■ वृत्तसंस्था, अमृतसर, दि. ६ :
पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर, पोलिसांनी पंजाबमधील शहीद भगतसिंग नगर (नवा शहर) च्या जंगलातून २ आरपीजी, २ आयईडी, ५ हँडग्रेनेड आणि एक वायरलेस कम्युनिकेशन सेट जप्त केला.

गुप्तचर माहितीनंतर, अमृतसरचे राज्य विशेष ऑपरेशन्स सेल केंद्रीय एजन्सीसह टिब्बा नांगल-कुलार रोडजवळील जंगलात पोहोचले. शोध मोहिमेदरम्यान पथकाला स्फोटक पदार्थ सापडले. पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर लिहिले, सुरुवातीच्या तपासात असे दिसून आले आहे की पाकिस्तानच्या आयएसआयने पंजाबमध्ये लपलेले स्लीपर सेल पुन्हा सक्रिय करण्याची योजना आखली होती.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# सेवासंधी सोन्याची

आपल्या देशात सोयीप्रमाणे निवडणूका कधी घ्याव्यात हे सत्ताधारी ठरवतात. जर घ्यायचीच नसेल तर एखाद्या फुसके कारण दाखवून न्यायालयात घोळ घालता येतो. आपल्याकडे अमेरिकेसारख्या विशिष्ट तारखा नाहीत. त्यामुळे लोकसभा आणि विधानसभा सोडली. तर स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुकीबाबत इतकी उदासीनता दिसून येते की, नगरसेवक होणाऱ्यांच्यासाठी हे सर्व किती त्रासदायक होते. हे 'जावे नगरसेवकेच्छुकाचा मना तेव्हा कळे' अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज-काल 'जो न करे सरकार तो जावो न्यायालय के द्वार, न्यायालयही लगायेगा सबका बेडा पार' अशी स्थिती आहे. जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेची निवडणूक इतक्यात घ्यायची नव्हती. पण सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला. निवडणूक घ्या म्हणजे घ्या! तशी ती घेतली आणि त्या राज्यात ज्या ज्या आमदारेच्छुक महानुभवांना निवडणूक लढता आली व ज्यांच्या नशिबात होते ते जिंकले. आता महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका नगरपरिषदा व इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका खुंटीवर टांगल्यासारखे झाले होते. सर्व काही प्रशासकांच्या हाती अधिकार देण्यात आलेले होते. आपल्या अधिकार कपातीमुळे कितीतरी माजी नगरसेवक किंवा भविष्यातील नगरसेवकेच्छुक म्हणजेच भावी नगरसेवक शोक सागरात बुडालेले होते. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे किरकोळ किरकोळ गोष्टींची खुस्पटे काढून त्या निवडणुकांचा मार्ग अवरूद्ध करण्यात आला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने चक्क आदेश दिलेला आहे की, येत्या चार आठवड्यात या निवडणुकांची अधिसूचना काढा. त्यानंतर चार महिन्यात निवडणुका घ्या. म्हणजे आता जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीप्रमाणे आपल्या राज्यातही नगरसेवकांच्या आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधींच्या निवडणुकांची दारे मोकळी झालेली आहेत. निवडणुकांशिवाय बिचारे कोट्यावधी राजकीय कार्यकर्ते भणंग होत चालले होते. त्यांच्या रोजीरोटीचा सवाल उभा झाला होता. त्याप्रमाणेच होणाऱ्या नगरसेवकांच्याही सेवा व्रताचा शुभारंभ आता त्यांनाही करता येईल. हे बिचारे नगरसेवकेच्छुक उमेदवार या तीन-चार वर्षात गलितगात्र झालेले होते. अनेक नगरसेवकांनी आपल्या नावाच्या आधी मा. नगरसेवक असे लिहून आपले कार्ड छापले होते. आता या मा. चा अर्थ माननीय ही होतो आणि माजी ही होतो. पण अनेक पाजी लोकांना कोट्या करण्याची सवय असते. त्यामुळे यातले अनेक माजी अगदी कासावीस झालेले होते. त्यांचे पाणीदार डोळे अश्रूपुर येऊन गळू लागल्याने त्यांच्या डोळ्यातील पाणीदारपणा अक्षरशः लुप्त झाला होता. सुरुवातीचा काही काळ आता निवडणुकीची घोषणा होईल. मग निवडणुकीची घोषणा होईल. अशी आर्त आळवणी करून करून आपल्या भक्ती गंगेचा प्रवाह वाहवत वाहवत अखेर ही मंडळी निराशेच्या गर्तेत सापडली होती. मात्र माननीय सर्वोच्च न्यायालयाला या सेवकांची दया आली आणि मग न्यायालयाची माया पातळ झाली. त्यामुळे आता या भावी नगरसेवकांनी आपली माया अशीच कायम ठेवावी. कारण आता न्यायालयाने स्वतःच्या अधिकारात त्यांच्यासाठी स्वर्गाचे दार उघडलेले आहे. यापुढे सारी मज्जाच मज्जा आहे. या सोन्यासारख्या सेवा संधीचे स्वागतच!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# चार महिन्यांत निवडणूका घ्या!

## सर्वोच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश ▪ ओबीसींना २०२२ पूर्वीचे आरक्षण

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६ :
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका पुढील ४ महिन्यांच्या आत घेण्याचे महूत्वपूर्ण निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी एका प्रकरणात सुनावणी करताना दिले.

कोर्टाने ही निवडणूक १९९४ ते २०२२ पर्यंत ओबीसी आरक्षणाची जी स्थिती होती त्यानुसार घेण्याचे आदेश दिलेत. विशेषतः राज्य निवडणूक आयोगाला यासंबंधी ४ आठवड्यांच्या आत अधिसूचना जारी करण्याचेही निर्देश दिलेत. त्यामुळे महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बार दिवाळीपूर्वी उडणार हे निश्चित झाले आहे.

ओबीसी आरक्षणाच्या वादामुळे महाराष्ट्रात २०२१ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती एन के सिंह यांच्या खंडपीठापुढे मंगळवारी या प्रकरणी सुनावणी झाली. त्यात कोर्टाने ह्या निवडणुका ४ महिन्यांच्या आत घेण्याचे निर्देश दिलेत.

> स्थानिक स्वराज्य संस्थांना अनिश्चित काळासाठी वाऱ्यावर सोडता येणार नाही. वेळेवर निवडणुका हे तळागाळातील लोकशाहीचे सार आहे. त्यामुळे जिथे मुदत संपली आहे किवा प्रशासन राज आहे अशा सर्वच महापालिका, नगर परिषदा, नगर पंचायती व जिल्हा परिषदांची लवकर निवडणुका घेण्यात याव्यात, असे निरिक्षणही कोर्टाने आपल्या आदेशात नोंदवले आहे.

कोर्टाच्या आदेशांनुसार, ओबीसी समुदायाला २०२२ पूर्वी असणारे आरक्षण कायम ठेवून ४ महिन्यांच्या आत ही निवडणूक घ्यावी लागेल.

कोर्टाने आपल्या आदेशात काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५ वर्षांपासून निवडणूक झाली नसल्याची बाब प्रामुख्याने अधोरेखित करण्यात आली आहे. त्यामुळे कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला ४ आठवड्यांच्या आत अधिसूचना काढण्याचे निर्देश दिलेत.

ही निवडणूक बांठिया आयोगाच्या अहवालाला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील निकालाच्या अधीन असतील, असेही कोर्टाने या प्रकरणी स्पष्ट केले आहे.

> निवडणुकांचा मार्ग मोकळा कोर्टाच्या या आदेशामुळे महाराष्ट्रातील विविध महापालिकांच्या निवडणुकांना आता गती मिळणार आहे. मागील अनेक वर्षांपासून मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आदी महापालिकांचे कार्यकाळ संपल्याने प्रशासकांच्या माध्यमातून कामकाज सुरू होते. पण आता कोर्टाच्या आदेशामुळे निवडणुका टाळणे अशक्य झाले आहे. परिणामी, राज्य सरकारवर मोठा राजकीय व न्यायिक दबाव निर्माण झाला आहे.

**ओबीसी नेत्यांचा आनंद**

ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी कोर्टाच्या या निर्णयावर आनंद व्यक्त केला आहे. ते म्हणाले, निवडणुका गेले ३-४ वर्षांपासून रखडल्या होत्या आणि यात जवळपास ओबीसीच्या आरक्षणाच्या ३४ हजार जागा ज्या आहेत त्या कमी झाल्या होत्या. त्यामुळे ओबीसी समाजावर फार मोठे संकट निर्माण झाले होते. परंतु आजच्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे संकट दूर झाले आहे. छगन भुजबळ आणि इतर नेत्यांनीही या निर्णयाचे स्वागत केले.

> स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेवर न घेणे हे लोकशाहीच्या मूळ तत्वांचा अवमान आहे. सद्यस्थितीत ग्रामपंचायत ते जिल्हा परिषदांपर्यंत सर्वच प्रतिनिधिक संस्था केवळ अधिकाऱ्यांच्या ताब्यात असल्याचे चित्र आहे. हे अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची रखडलेली निवडणूक २०२२ च्या जुलैपूर्वी लागू असलेल्या ओबीसी आरक्षणाच्या आधारे घेण्यात याव्यात. हा आदेश अंतिम नाही. बांठिया आयोगाच्या अहवाला देण्यात आलेल्या आव्हान याचिकांवरील निर्णयानंतर या निवडणुकांच्या वैधतेवर फेरविचार होऊ शकतो, असे कोर्ट म्हणाले.

## महायुती एकत्र लढणार

### मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६ :
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महयुती एकत्रित लढेल. एखाद्या ठिकाणी एखादा वेगळा निर्णय स्थानिक स्तरावर होऊ शकतो. पण धोरण म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्र लढेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

चोंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका पुढील ४ महिन्यांच्या आत घेण्याचे महूत्वपूर्ण निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी एका प्रकरणात सुनावणी करताना दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर आता आगामी निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे.

## आता १५० दिवसांचा दुसरा कृती आरखडा

विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित १५० दिवसांचा दुसरा कृती आराखडा मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केला.

१०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा आणि धोरणात्मक बाबींवर आधारित कार्यक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. राज्यातील १२ हजार ५०० शासकीय कार्यालये या कार्यक्रमात सहभागी झाली. मंत्रालयातील ४८ विभाग या कार्यक्रमात सहभागी झाले. या विभागातील ९०२ विषयांवर धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित असताना ७०६ विषयांवर आधारित निर्णय घेऊन आवश्यक बदल करण्यात आले. यामध्ये काही धोरणात्मक बदल करण्यात आले तर काही प्रक्रियात्मक बदल करण्यात आले. या कार्यक्रमास मिळालेल्या चांगल्या प्रतिसादामुळे १५० दिवसांच्या कार्यक्रमाची सुरुवात आजपासून २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सुरू राहील, अशी माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली. विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर हा कार्यक्रम आधारित असेल. परिमाण निश्चित करण्याचे फडणवीस म्हणाले.

## २४४ जिल्ह्यांमध्ये आज मॉक ड्रिल




■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :
पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, बुधवारी देशातील २४४ भागात युद्धात टिकून राहण्याच्या तंत्रांवर मॉक ड्रिल आयोजित केले जातील. गृह मंत्रालयाने या भागांना नागरी संरक्षण जिल्हे म्हणून सूचीबद्ध केले आहे.

नागरी संरक्षण जिल्हे त्यांच्या संवेदनशीलतेनुसार ३ श्रेणींमध्ये विभागले गेले आहेत. श्रेणी-१ सर्वात संवेदनशील आहे आणि श्रेणी-३ कमी संवेदनशील आहे. ५ मे रोजी गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना मॉक ड्रिल करण्याचे आदेश जारी केले होते.

आज दिल्लीतील गृह मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मॉक ड्रिलच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. राज्यांचे मुख्य सचिव आणि नागरी संरक्षण प्रमुखांसह अनेक उच्चपदस्थ अधिकारी त्यात उपस्थित होते. गृह मंत्रालयाने मंगळवारी मॉक ड्रिल आयोजित केल्या जाणाऱ्या जिल्ह्यांची यादी जाहीर केली. यामध्ये, राज्यनिहाय संवेदनशीलतेच्या आधारावर जिल्ह्यांची विभागणी करण्यात आली आहे. देशातील २५ राज्यांमधील एकूण २४४ नागरी संरक्षण जिल्ह्यांना श्रेणी-१ ते ३ दरम्यान ठेवण्यात आले आहे.

७ मे रोजी देशभरात मॉक ड्रिल होणार आहे. यापूर्वी, युद्धादरम्यान टिकून राहण्यासाठी लखनौ, श्रीनगर आणि मुंबईत पोलिस, एसडीआरएफ आणि इतर बचाव पथकांना प्रशिक्षण दिले जात आहे.

## ट्रॅक्टरला स्कॉर्पिओची धडक

**८ वऱ्हाडी ठार**

■ वृत्तसंस्था, कटिहार(बिहार), दि. ६ :
बिहारमधील कटिहारमध्ये लग्नासाठी निघालेल्या वऱ्हाडींची स्कॉर्पिओ रस्त्यावरील उभ्या ट्रॅक्टरला धडकली. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. २ जण जखमी झाले. गाडीत १० जण होते. हे सर्वजण कटिहारच्या कुसेर्ला पोलिस स्टेशन हद्दीतील कोष्कीपूरला जात होते.

समेली ब्लॉक ऑफिसजवळ रात्री उशिरा हा अपघात झाला. मृतांपैकी ६ जण सुपौलचे रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. धिबरा बाजार, बारहारा कोठी, जिल्हा पूर्णिया येथून लग्नाचे वऱ्हाड कोशकीपूरला जात होते. चांदपूर पश्चिम पंचायतीच्या चांदपूर चौकात वाहन अनियंत्रित झाले आणि ट्रॅक्टरला धडकले. यात ८ जणांचा मृत्यू झाला.

## राज्यातील सर्व शासकीय पत्रव्यवहारांवर पुण्यश्लोक ३०० बोधचिन्हाचा वापर अनिवार्य

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त राज्य शासनाने विशेष पुण्यश्लोक ३०० हे बोधचिन्ह तयार केले असून, याचा वापर आता सर्व शासकीय पत्रव्यवहारांमध्ये अनिवार्य करण्यात आला आहे. या निर्णयामुळे अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करत त्यांचे विचार आणि प्रेरणादायी जीवनगाथा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य शासनाचा संकल्प स्पष्ट झाला आहे.

या विशेष बोधचिन्हात पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा फोटो असून, हे चिन्ह राज्य शासनाच्या सर्व अधिकृत पत्रांवर, परिपत्रकांवर आणि शासकीय कागदपत्रांवर छापले जाणार आहे.

## महाराष्ट्रात १६ ठिकाणी मॉक ड्रिल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
महाराष्ट्रात बुधवार ७ मे रोजी १६ महत्त्वाच्या ठिकाणी नागरी संरक्षणासाठी मॉक ड्रिल आयोजित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील मुंबई, उरण (जेएनपीटी), तारापूर, पुणे, ठाणे, नाशिक, थळ-वायशेत, रोहा-धाटाव-नागोठणे, मनमाड, सिन्नर, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ठिकाणांचा समावेश आहे. ही कवायत राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील क्षेत्रांमध्ये आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याची तयारी तपासण्यासाठी होत आहे.

महाराष्ट्रातील मॉक ड्रिल तीन श्रेणींमध्ये विभागली गेली आहे. श्रेणी १ मध्ये मुंबई, उरण आणि तारापूर यांसारख्या अति-संवेदनशील क्षेत्रांचा समावेश आहे, तर श्रेणी २ मध्ये पुणे, ठाणे, नाशिक, मनमाड, सिन्नर, पिंपरी-चिंचवड, थळ-वायशेत आणि रोहा-नागोठणे यांचा समावेश आहे. श्रेणी ३ मध्ये संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग यांचा समावेश आहे.

## केंद्रीय मंत्री उरांव रेल्वेतून बेपत्ता



■ वृत्तसंस्था, जबलपूर, दि. ६ :
दिल्लीहून गोंडवाना एक्स्प्रेसने जबलपूरला येणारे केंद्रीय मंत्री जुएल उरांव रेल्वेतून रहस्यमयरीत्या गायब झाले. शनिवारी रात्री हजरत निजामुद्दीन येथून निघालेल्या रेल्वेत ते शेवटचे दिसले. रविवारी सकाळी दमोह येथे त्यांची बर्थ रिकामी आढळली.

ही बातमी मिळताच खळबळ उडाली. सुमारे ३ तास रेल्वे आणि रुळावर शोध घेतल्यानंतर ते १६२ किमी दूर सिहोरा स्टेशनवर (जबलपूर) संपर्क क्रांती एक्स्प्रेसच्या कोच बी३ च्या बर्थ ५७ वर सापडले. त्यांच्या हातापायांवर जखमेचे व्रण होते. सूत्रांनुसार, पहाटे ३:४५ वाजता मंत्री दमोह स्टेशनवर उतरले. त्याच वेळी त्यांची शुगर लो झाली आणि ट्रेन सुरू झाली. ट्रेनमध्ये चढताना त्यांचा पाय घसरला आणि त्यांना दुखापत झाली. याच दरम्यान दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर संपर्क क्रांती आली आणि मंत्री त्यात बसले. त्यांचा स्टाफ त्यांचा शोध घेत राहिला. पीएने सांगितले की मंत्री हरदुआ येथे गायब झाले.

नंतर कळले की येथे ट्रेन थांबलीच नाही. सकाळी ६:५५ वाजता मंत्री सिहोरा स्टेशनवर सापडले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना जबलपूरला आणण्यात आले. संपूर्ण घटनेवर मंत्री उरांव यांची कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

## मुख्यमंत्र्यांकडून वैभवीचे अभिनंदन



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६ :
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गेल्यावर्षी निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर दोन महिन्यांत त्यांची कन्या वैभवी देशमुख हिने दुःखाचा डोंगर पेलत बारावीची परीक्षा दिली.

काल बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून वैभवीने बारावीच्या विज्ञान शाखेच्या परीक्षेत ८५.३३ टक्के गुण मिळवून यश संपादित केले आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैभवी देशमुख हिला फोन करून तिचे अभिनंदन केले.

सोबतच देवेंद्र फडणवीस यांनी वैभवी देशमुखला पत्र सुद्धा लिहून बारावीच्या यशाबद्दल तिला शुभेच्छा दिल्या आहेत. अंबाजोगाईचे एसडीओ दीपक वाजळे यांनी वैभवी देशमुख हिला प्रत्यक्ष भेटून मुख्यमंत्र्यांचे पत्र दिले आहे. अतिशय कठीण परिस्थितीला तोंड देत बारावीच्या परीक्षेत अतिशय चांगले यश तू संपादन केलेस, तुझे अभिनंदन. तुझ्या आजच्या या यशाचा तुझे वडील स्व. संतोष देशमुख यांना किती आनंद झाला असता. पण, ते आज आपल्यात नाहीत. पण, तुझ्या पाठीवर कौतुकाची थाप आज संपूर्ण महाराष्ट्र देतोय, असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

# चौंडीत उन्हामुळे मंत्रिमंडळ घामाघूम





■ वृत्तसंस्था
अहिल्यानगर, दि. ६ :
अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या जन्मगावी चौंडी येथे आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळ चौंडी गावात दाखल झाले होते.

बैठकीच्या आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मारकाच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे स्मारकाच्या सद्यस्थितीची माहिती घेताना काही काळ तिथे रेंगाळले. तर मंत्रिमंडळ बाहेर ताटकळत उभे होते.

यावेळी मंत्रिमहोदयांना उन्हाचा त्रास सहन करावा लागला. अनेक मंत्र्यांनी उन्हापासून बचावासाठी स्मारक परिसरातील झाडांच्या सावलीचा आधार घेतला. मंत्री शंभुराजे देसाई यांना ऊन सहन न झाल्याने त्यांनी सर्व प्रोटोकॉल बाजूला ठेवत, एका झाडाखाली बाकवर बसून विश्रांती घेतली.

मुख्यमंत्र्यांची वाट पाहत असताना, काही मंत्री सावली शोधत स्मारक परिसरातील झाडांखाली उभे राहिले. भर दुपारी बारा वाजेचे ऊन असल्यामुळे उन्हाच्या तडाख्यामुळे अनेक मंत्री घामाघूम झाले. काही महिला मंत्री अस्वस्थही झाल्या.

अशातच शिवसेनेचे मंत्री शंभुराजे देसाई यांना ऊन सहन न झाल्यामुळे त्यांनी झाडाखाली बाकावर बसून विश्रांती घेतली. त्यांनी टेम्परेचर किती आहे रे? अशी विचारणा केली असता, त्यावर एकाने साहेब चाळीसच्या आसपास असेल असे उत्तर दिले. त्यावर मंत्री देसाई म्हणाले, काही पण सांगू नको रे, जास्तच आहे, ४२-४२ असेल. एवढे कुठे असते का ऊन, असा प्रतिप्रश्न केला आणि ते थोडा वेळ झाडाखाली विसावले.

त्याचवेळी एक व्यक्ती मंत्री देसाई यांना भेटण्यासाठी तिथे आला. तो देसाई यांच्या शेजारीच उभा राहिला. देसाई यांनी त्याला जवळ बोलावत आपल्या शेजारी बाकावर बसवले. त्या व्यक्तीने साहेब प्रोटोकॉल आहे. पाळावा लागेल, असे म्हटले असता प्रोटोकॉल बाजूला ठेव, मी पण तुमच्यातलाच आहे, असे म्हणत मंत्री देसाई यांनी वातावरण हलकेफुलके केले. यावेळी मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह अनेक मंत्र्यांनीही सावलीचा आधार घेत उन्हापासून बचाव केला.

दरम्यान, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकारातून प्रथमच चौंडीमध्ये अशा प्रकारची उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीसाठी मुंबईसह अहिल्यानगरमधील प्रशासन चौंडीत दाखल झाले होते.

## अहिल्यादेवी होळकरांचा जीवनपट रुपेरी पडद्यावर

### विशेष मंत्रिमंडळ बैठकीत ऐतिहासिक निर्णय

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. ६ :
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त चौंडी-अहिल्यानगर येथे मंगळवारी पार पडलेल्या विशेष मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले.

या बैठकीत एकूण ११ निर्णयांना मान्यता देण्यात आली असून, यामुळे केवळ अहिल्यादेवींच्या स्मृतींचा गौरवच होणार नाही, तर संपूर्ण जिल्ह्याचा आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होण्यास चालना मिळणार आहे.

अहिल्यादेवींच्या जीवनावर आधारित व्यावसायिक मराठी आणि बहुभाषिक चित्रपट निर्मितीस मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, यासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ कार्यान्वयन संस्था म्हणून काम पाहणार आहे. त्याचबरोबर, अहिल्यादेवींनी उभारलेल्या ३४ ऐतिहासिक जलस्त्रोतांचे सर्वेक्षण, जतन व पुनरुज्जीवन करण्यासाठी ७५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

चौंडी येथील अहिल्यादेवी स्मृतिस्थळाच्या विकासासह अष्टविनायक, तुळजाभवानी, ज्योतीबा, त्र्यंबकेश्वर, महालक्ष्मी व माहुरगड या प्रमुख धार्मिक स्थळांच्या विकासासाठी ५,५०३.६९ कोटी रुपयांच्या मंदिर विकास आराखड्यालाही मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे.

**आदिशक्ती अभियान**

महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू, लिंगभेद, बालविवाह व कुटुंबातील हिंसाचार आदी सामाजिक प्रश्नांवर जनजागृती होणार आहे. उत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना आदिशक्ती पुरस्कार दिला जाणार असून, यासाठी १०.५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**धनगर समाजासाठी विशेष शैक्षणिक योजना**

धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी यशवंत विद्यार्थी योजना आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना जाहीर करण्यात आली. यशवंत योजनेत दरवर्षी १०,००० विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी निवासी शाळांमध्ये शिक्षण दिले जाणार आहे. आतापर्यंत २८८.९२ कोटी रुपये वितरित झाले आहेत. त्याचबरोबर पुणे, नागपूर, नवी मुंबई, नाशिक, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर येथे मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २०० क्षमतेची वसतिगृहे उभारली जाणार आहेत. नाशिक येथे काम सुरू असून इतर ठिकाणीही लवकरच सुरुवात होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात १०० विद्यार्थ्यांचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्यासाठी ४८५.०८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. मुली आणि महिलांसाठी नवीन आयटीआय उभारण्याचा आणि राहुरी येथे वरिष्ठ दिवाणी न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

मिशन महाग्राम कार्यक्रमाची मुदत २०२८ पर्यंत वाढवण्यात आली असून, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणासाठी अध्यादेश २०२५ जारी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सरकारच्या धोरणात्मक पुढाकारामुळे राज्याच्या सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्राला नवीन दिशा मिळणार आहे.

## प्रदूषण करणाऱ्या वाहनांना इंधन बंदी?



■ **मुंबई** : राज्यात वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी परिवहन विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. तांत्रिकदृष्ट्या सदोष व प्रदूषण करणाऱ्या वाहनांना पेट्रोल पंपावर इंधन न देण्याच्या धोरणावर राज्य शासन गांभीर्याने विचार करत असून, लवकरच कठोर नियम लागू करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्रालयात झालेल्या मोटार परिवहन विभागाच्या आढावा बैठकीत सरनाईक बोलत होते. या बैठकीला परिवहन विभागाचे सहसचिव किरण होळकर, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सरनाईक यांनी सांगितले की, पारंपरिक इंधनावर चालणाऱ्या वाहनांमुळे दिवसेंदिवस वायू प्रदूषण वाढत आहे. शासनाने वाहनांसाठी प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र बंधनकारक केले असले, तरी अनेक वेळा हे प्रमाणपत्र चुकीच्या पद्धतीने किंवा बोगस स्वरूपात घेतले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तांत्रिकदृष्ट्या सदोष वाहनांमुळे हवा गुणवत्ता निर्देशांक सतत घसरत आहे, त्यामुळे अशा प्रकारच्या वाहनांना इंधन न देण्याची सक्ती करण्यात येणार आहे. लवकरच दफ कोड आधारित डिजिटल सिस्टीम लागू करण्यात येणार असून, प्रत्येक पेट्रोल पंपावर वाहनाची तपासणी करूनच इंधन दिले जाईल.

सरनाईक म्हणाले की, आपल्या पिढीने भविष्यातील पिढीचा विचार करून पर्यावरण वाचवण्याचे भान ठेवले पाहिजे. शुद्ध हवेसाठी आत्ताच उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे कठोर निर्णय घेणे ही काळाची गरज आहे. परिवहन विभाग लवकरच या धोरणाचा अधिकृत प्रस्ताव तयार करून त्याची अंमलबजावणी करणार आहे. यामुळे प्रदूषण रोखण्यास मदत होणार असून, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी हे धोरण उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. राज्यभरातील वाहनधारकांनी वेळेवर आणि योग्य प्रकारे प्रदूषण प्रमाणपत्र घेणे अत्यावश्यक ठरणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

## विकासाला विरोध करणाऱ्यांना फटके देऊ



**सिंधुदुर्ग** : विरोधाला विरोध करणाऱ्यांना, विकासात आडवे येणाऱ्यांना फटके देऊ, असे वक्तव्य खासदार नारायण राणे यांनी केले आहे. शक्तिपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्यांना संबोधत राणे यांनी हे वक्तव्य केले आहे. सिंधुदुर्ग येथील सावंतवाडी येथे आयोजित जिल्हाधिकाऱ्यांसोबतच्या बैठकीत त्यांनी हे विधान केले.

शक्तिपीठ महामार्ग सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 12 गावांमधून जाणार आहे. यासाठी लोकांच्या समस्यांबाबत जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आहे. जनतेचे प्रश्न सोडवण्यात येतील. विरोधाला विरोध करणाऱ्यांना, विकासात आडवे येणाऱ्यांना फटके देऊ. तसेच जंगल कोणी राखत नाही, ती आपोआप राखली जातात. वन्यजीव ती राखतात, असे नारायण राणे म्हणाले.

शक्तिपीठ महामार्ग हा महायुती सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. नागपूर ते गोवा असा हा महामार्ग असणार आहे. या महामार्गात अनेक तीर्थक्षेत्र येतात. अनेक जिल्ह्यांमधून या महामार्गाला विरोध होताना दिसत आहे. शेतकऱ्यांनी या महामार्गाच्या विरोधात आंदोलन देखील केले. लोकांच्या काही समस्यांबाबत नारायण राणे यांनी माहिती जाणून घेतली. तसेच यावेळी त्यांनी त्यांचे परखड मत बोलून दाखवले आहे.

दरम्यान, राज्यभरातून या महामार्गाला विरोध होत असला तरी हा शक्तिपीठ महामार्ग करायचाच असा निर्धार महायुती सरकारने घेतलेला दिसत आहे. लातूर जिल्ह्यातील काही गावांमध्ये तर गावकऱ्यांनी मोजणी अधिकाऱ्यांना गावात येऊ सुद्धा दिले नव्हते. तसेच शेतकऱ्यांनी देखील याला विरोध दर्शवला आहे.

## भांडूपचा भोंगा पाकिस्तानची भाषा बोलतो



■ **मुंबई** : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकार आणि लष्कर बदला घेण्यासाठी निर्णायक पावले उचलत असतानाच, काँग्रेस आणि भांडूपचा भोंगा पाकिस्तानसदृश भाषा बोलतो आहे, अशी घणाघाती टीका शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर केली. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत निरुपम यांनी राऊतांवर जोरदार हल्ला चढवत, जनतेला त्यांच्या वक्तव्यांचा निषेध करण्याचे आवाहन केले.

संजय राऊत यांना भांडूपचा भोंगा अशी उपमा देत निरुपम म्हणाले, संजय राऊत हे सतत महाराष्ट्रविरोधी आणि देशविरोधी बोलतात. काल त्यांनी 'लाडकी बहिण' योजना बंद झाली असल्याची खोटी माहिती पसरवली. ही योजना सुरूच असून सरकार दरमहा लाभार्थींना पैसे देत आहे. भविष्यात हा लाभ २१०० रुपये करण्याचा शिवसेना नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा स्पष्ट शब्द आहे.

निरुपम यांनी आणखी एक गौप्यस्फोट करत सांगितले की, संजय राऊत ज्या भाजपविरोधात हुकुमशाहीविरोधी लढ्याची भाषा करतात, त्याच भाजपसोबत युतीसाठी उद्धव ठाकरे सातत्याने प्रयत्न करत होते. त्यांच्या पक्षातील अनेक खासदार भाजपकडे जाण्याच्या तयारीत असताना, उद्धव ठाकरे यांनी त्यांना रोखले आणि सर्वांनी एकत्रच भाजपमध्ये जाऊया असे आवाहन केले होते. मात्र भाजपने आता उद्धव ठाकरे यांच्यासाठी दरवाजे बंद केले आहेत. निरुपम यांनी स्पष्टपणे सांगितले की, राऊत यांचे बोलणे केवळ खोटे प्रचार आणि दिशाभूल आहे. अशा वक्तव्यांनी पाकिस्तानप्रेमी भूमिका दर्शवण्याचा प्रयत्न होत आहे. देशाच्या सुरक्षेच्या संवेदनशील काळात अशा वक्तव्यांचा जनतेने निषेध करावा.

## चौंडीतील मंत्रिमंडळ बैठकीमुळे
# मंत्रालयात शुकशुकाट



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** अहिल्याबाई नगर येथील चौंडी येथे मंगळवार ६ मे रोजी राज्य मंत्रिमंडळाची ऐतिहासिक बैठक पार पडली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित या बैठकीमुळे मुंबईतील मंत्रालयात अभूतपूर्व शांतता पाहायला मिळाली.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संपूर्ण मंत्रिमंडळासह वरिष्ठ सनदी अधिकारी चौंडीत दाखल झाल्याने मंत्रालयातील नेहमीची लगबग थांबली. नेहमी मंगळवारी बैठकीच्या निमित्ताने मंत्रालयात येणाऱ्या अभ्यागतांनीही पाठ फिरवल्याचे चित्र होते.

महायुती सरकारने ग्रामीण भागात प्रथमच मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करून राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. अहिल्यादेवींच्या जन्मभूमीतून विकासाच्या नव्या घोषणा आणि निधीवाटपाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सृष्टी, भुईकोट किल्ला संवर्धन, संत ज्ञानेश्वर सृष्टी आणि औद्योगिक विकास आराखड्यासाठी मोठा निधी मंजूर होण्याची शक्यता आहे. यासह, राज्य सरकारच्या ग्रामीण विकासाला चालना देण्याच्या रणनीतीचा भाग म्हणून ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

मात्र, मंत्रालयातील शुकशुकाटाने प्रशासकीय कामकाजावर परिणाम झाल्याची चर्चा आहे. मंत्रालयात नेहमीच्या मंगळवारच्या गजबजाटाऐवजी शांतता नांदत असल्याने अनेक प्रलंबित प्रस्ताव आणि निर्णय प्रक्रिया रखडल्याचे बोलले जात आहे.

काही राजकीय विश्लेषकांच्या मते, महायुती सरकारने ही बैठक ग्रामीण मतदारांना आकर्षित करण्यासाठी आयोजित केली असली, तरी मंत्रालयातील कामकाजाच्या स्थगितीमुळे प्रशासकीय गोंधळाची शक्यता नाकारता येत नाही.

चौंडीतील या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, सरकारच्या पुढील राजकीय आणि प्रशासकीय रणनीतीवर त्याचा कसा परिणाम होतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## न्यायालयाचे हस्तक्षेप गरजेचेच होते...

### जयंत पाटील यांचा सरकारवर निशाणा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :** गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित होत्या. याच मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत केले आहे.

राज्यातील महापालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समित्या या लोकप्रतिनिधीऐवजी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहेत. हे चित्र लोकशाहीच्या विरोधात आहे. तीन वर्षांच्या कालावधीत राज्य सरकारने निवडणुका घेण्यास टाळाटाळ केली. यामुळे लोकशाही मूल्यांची गळचेपी झाली आहे,द्धअशी परखड प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिली.

पाटील म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने एक महिन्याच्या आत निवडणुका जाहीर करण्याचा आणि पुढील चार महिन्यांत प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश दिला. हा निर्णय म्हणजे लोकशाही प्रक्रियेला मिळालेली संजीवनी आहे. आम्ही पक्षाच्या वतीने न्यायालयाचे मनापासून आभार मानतो. या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून घेतल्या जातील. मात्र इतक्या वर्षांच्या विलंबामुळे सर्वच पक्षांचे कार्यकर्ते नाराज होते. आता नव्या नेतृत्वाला संधी मिळणार आहे. ही वेळ राज्यातील तरुण, अभ्यासू, कार्यक्षम नेतृत्वाला पुढे आणण्याची आहे.

पाटील यांनी राज्य सरकारवर निशाणा साधत सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगास गरज भासल्यास मुदतवाढ घेण्याची मुभा दिली असली तरी, राज्य सरकारने पुन्हा एकदा चालढकल करू नये. निवडणुकीसाठी आवश्यक असलेली सर्व तयारी शासनाने तत्काळ पूर्ण करावी ही आमची ठाम मागणी आहे. लोकशाही ही फक्त मतदाराचा हक्क नाही, ती जबाबदारीही आहे. राज्य सरकारने ही जबाबदारी झटकून टाकली होती. आता सर्वोच्च न्यायालयामुळेच ती जबाबदारी पुन्हा लोकांच्या हाती येणार आहे, असे सांगत जयंत पाटील यांनी लोकशाहीसाठी लढा देण्याचे स्पष्ट संकेत दिले.

## मातीपेक्षा जातीला जास्त महत्त्व..



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** सद्यस्थितीत केंद्रात व राज्यात मातीपेक्षा जातीला फार महत्त्व आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न सोहळे थांबून नेत्यांच्या पक्ष प्रवेशाचे सोहळे जास्त रंगत आहेत, अशी टीका रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी केली आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतेच काँग्रेस पक्ष फोडून त्यांच्या नेत्यांना भाजपमध्ये आणण्याचे विधान केले होते. त्यावरून सदाभाऊ खोत यांनी उपरोक्त विधान केले आहे.

सध्या केंद्रात व राज्यात मोठ्या प्रमाणात राजकीय नेते पक्षांतर करत आहेत. हे सर्व नेते ठराविक आहेत. त्यांना राज्यातील शेतकऱ्यांचे काहीही देणेघेणे नाही. शेतकऱ्यांच्या मुलांची लग्ने होत नाहीत. त्यांच्या मुलांचे लग्न सोहळे थांबलेत आणि या राजकीय नेत्यांच्या पक्ष प्रवेशाचे सोहळे सुरू झालेत याची मला खंत वाटते. सध्या केंद्रात व राज्यात मातीपेक्षा जातीला जास्त महत्त्व आले आहे. जी जात श्रेष्ठ त्या जातीचा नेता राजकीय पटलावर महत्त्वाचा व वजनदार मानला जात आहे. हे एक नवे राजकीय समीकरण तयार होऊ लागल्याचे ते म्हणाले.

## एक ऐवजी दोन चपटी प्या..

### एसटी कर्मचाऱ्यांना मंत्री गोगावलेंचा अजब सल्ला



■ **वृत्तसंस्था रायगड, दि. ६ :** राज्य परिवहन महामंडळाच्या कामगार संघटनेचे ५७ वे राज्यव्यापी अधिवेशन सोमवारी रायगड येथे पार पडले. या अधिवेशनात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासह मंत्री भरत गोगावले देखील उपस्थित होते.

यावेळी भाषण करताना भरत गोगावले यांनी कर्मचाऱ्यांना दिलेल्या सल्ल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. एक ऐवजी दोन चपटी प्या पण ड्यूटी संपल्यावर, असा सल्ला गोगावले यांनी दिला.

भरत गोगावले उपस्थित एसटी कर्मचाऱ्यांना संबोधित करताना एसटी चालकांकडून मद्यपान केल्याने अपघात होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. तेव्हा गोगावले म्हणाले, एक ऐवजी दोन चपटी प्या पण ड्यूटी संपल्यावर, असा सल्ला त्यांनी दिला. त्यांनी दिलेल्या या सल्ल्याची सध्या चर्चा सुरू आहे. ते म्हणाले, तुमच्याकडून अपघात होतात. कुणी जाणून बुजून करत नाही. मोबाईल आणि नशापन करून अपघात होतात. ड्युटी संपल्यावर एक चपटीऐवजी दोन प्या.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कर्मचाऱ्यांसाठी मोठी घोषणा केली आहे. एसटीच्या महिला कर्मचाऱ्यांना रात्रीची ड्यूटी नसणार आहे. महिला कर्मचाऱ्यांना रात्रीची ड्यूटी नसणार, रात्री ८ वाजेपर्यंत त्यांची ड्यूटी कशी संपेल हे पहावे, अशा सूचना सरनाईक यांनी दिल्या आहेत.

अधिवेशनाच्या सुरुवातीलाच महिला कर्मचाऱ्यांनी या बाबत परिवहन मंत्री सरनाईक यांना निवेदन दिलं होतं. त्याचा उल्लेख करत सरनाईक यांनी एसटीचे उपाध्यक्ष माधव कुसेकर यांना या बाबत जाहिररित्या सूचना केल्या.

दरम्यान, यावेळी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी परिवहन मंत्र्यांनी स्वतः लालपरी घेण्याचा निर्णय घेतला. एसटी नफ्यात नाही, असे अनेक मुद्दे मांडत काही मंत्री व सरकारवर ताशेरे ओढले.

### त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात परवानगीशिवाय
## प्रसादाच्या लाडूंची विक्री

### मंडळावर गुन्हा दाखल करा, पुरातत्व खात्याचे पत्र



■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ६ :** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरातील विश्वस्त मंडळ अडचणीत सापडले असून, त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी भारतीय पुरातत्व खात्याने केली आहे. मंदिर परिसरात नियमबाह्यरित्या प्रसादाच्या लाडूंचे वाटप आणि विक्री करण्यात येत असल्याचा ठपका ठेवत पुरातत्व खात्याने त्र्यंबकेश्वर पोलिसांकडे पत्र पाठवले आहे.

गुढी पाडव्याच्या निमित्ताने त्र्यंबकेश्वर मंदिरात विश्वस्त मंडळाकडून बुंदीच्या लाडूंच्या प्रसादाचे वाटप सुरु करण्यात आले होते. तिरुपती बालाजी, शिर्डी, पंढरपूरप्रमाणे येथेही भाविकांना प्रसाद स्वरूपात लाडू मिळावेत, या हेतूने हा उपक्रम सुरू करण्यात आला.

मात्र, मंदिर क्षेत्र हे भारतीय पुरातत्व खात्याच्या संरक्षणाखाली असल्याने कोणत्याही व्यावसायिक उपक्रमासाठी अधिकृत परवानगी घेणे आवश्यक असते. मात्र, लाडू वाटपाच्या नावाखाली त्याची विक्री सुरु झाली असून त्यासंबंधी अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या लाडू विक्रीविरोधात माजी विश्वस्तांनी देखील पुरातत्व खात्याकडे तक्रार नोंदवली होती. त्यानंतर खात्याने या प्रकरणाची दखल घेत त्र्यंबकेश्वर पोलिसांना पत्र पाठवून संबंधित विश्वस्त मंडळावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

त्र्यंबकेश्वर मंदिर हे संरक्षित स्मारक आहे. असे असतानाही तेथे अनधिकृतपणे व्यावसायिक लाडू विक्री सुरू केल्याचा गंभीर आरोप विश्वस्त मंडळावर करण्यात आला आहे. याप्रकरणी त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या विश्वस्त मंडळावर गुन्हा दाखल अशी मागणी भारतीय पुरातत्व खात्याने पाठवलेल्या पत्रात करण्यात आली आहे. त्यामुळे आता या प्रकरणावर त्र्यंबकेश्वर पोलिस नेमकी काय कारवाई करणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## किती दिवस टांगती तलवार ठेवणार?

### संजय राऊत यांचा सवाल



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** एखाद्या देशावर हल्ला झाल्यानंतर २४ तासांच्या आत बदला घेतला जातो. आता आमचा युद्ध सराव घेतला जातो. म्हणजे आमच्या हातात बंदूक देणार का? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे.

ज्या पद्धतीने थाळ्या वाजवल्या आणि टाळ्या वाजवल्या, तसे आता युद्ध सरावात आणखी एक दिवस का घालवता? आता सैन्याचा युद्ध सराव सुरू आहे. सैन्य हे कायम सज्ज असले पाहिजे. भारतीय सैन्य हे कायम सज्ज आहेच. मात्र, आता आमचा प्रश्न संरक्षण मंत्री आणि देशाचे पंतप्रधानांना प्रश्न आहे की, राष्ट्रपती ज्या तिन्ही सेना दलाच्या प्रमुख आहेत, त्यांना हे माहिती आहेत का? आपण युद्ध करत आहोत, हे त्यांना माहिती आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

भारत पाकिस्तानमधील युद्धाचा आर्थिक दृष्ट्या भारताला भविष्यात मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. देश आणि जनता भारताच्या सुरक्षेसाठी आणि अभिमानासाठी कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी तयार आहे. तुम्ही आहात म्हणून नाही, एका पक्षासाठी नाही, तर या देशासाठी आपण कायमच एक असल्याचे संजय राऊत यांनी यावेळी म्हटले आहे.

## मिठी नदीतील गाळ काढण्यात घोटाळा
# अनेक ठिकाणी छापेमारी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** मुंबईतील मिठी नदीतील गाळ काढण्याच्या घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) मंगळवारी पाच कंत्राटदार, तीन बीएमसी अधिकारी, दोन कंपनी प्रतिनिधी आणि तीन मध्यस्थांच्या विरुद्ध महापालिकेचे ५० कोटींहून अधिक रुपयांचे चुकीच्या पद्धतीने नुकसान केल्याबद्दल एफआयआर दाखल केला आहे. त्यामुळे आता या प्रकरणाकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शहरातील अनेक ठिकाणी छापे टाकले आहेत आणि मिठी नदीतील गाळ काढण्याच्या घोटाळ्याप्रकरणी पहिला एफआयआर नोंदवला आहे.

पोलिसांना या स्वच्छता प्रकल्पात भ्रष्टाचार झाल्याचा संशय आहे. मंगळवारी, ६ मे रोजी सकाळी किमान ८ ठिकाणी छापे टाकले, ज्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कंत्राटदारांच्या निवासस्थाने आणि कार्यालयांचा समावेश आहे. विशेष तपास पथकाच्या निष्कर्षांच्या आधारे हा एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या ऑगस्टच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान उपस्थित झालेल्या मुद्द्यानंतर या प्रकरणी एसआयटीची स्थापना करण्यात आली होती. भाजपचे आमदार प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांनी चिंता व्यक्त केली होती.

मुंबईतील मीठी नदीतील गाळ काढण्याच्या प्रकल्पात मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप झाला आहे. या प्रकल्पासाठी २००५ पासून सुमारे ११०० कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, आर्थिक गुन्हे शाखेच्या विशेष तपास पथकाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

या प्रकरणात १० ठेकेदारांची चौकशी केली असून, त्यांनी प्रत्यक्षात किती गाळ काढला याची पडताळणी केली जात आहे. सफाईच्या कामाचे व्हिडिओ, फोटो आणि संबंधित ॲप्लिकेशनचा डेटा मागवण्यात आला आहे.

# समाजवादी विचारांच्या कामगार संघटनांचा एकजुटीचा निर्धार



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :** मुंबई आणि महाराष्ट्रातील समाजवादी विचारसरणीच्या विविध कामगार संघटनांनी खासगीकरण आणि कंत्राटीकरणाच्या विरोधात एकत्र येत एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार केला आहे. दादर येथील साने गुरुजी विद्यालयात पार पडलेल्या बैठकीत हा ठराव करण्यात आला.

ही बैठक हिंद मजदूर किसान पंचायतचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आणि माजी आमदार कपिल पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कामगार नेते व माजी केंद्रीय मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांचे सहकारी सुभाष मळगी होते. बैठकीत उपस्थित नेत्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी सामाजिक न्यायाच्या तत्वांवर आधारित संयुक्त संघर्षाची तयारी दर्शवली.

कपिल पाटील यांनी यावेळी प्रस्थापित राजकीय पक्षांकडून कामगारवर्गाच्या हिताची अनास्था होत असल्याची टीका करत, हे पक्ष सत्ताधाऱ्यांचे प्रतिनिधीत्व करत असल्याने कामगार, कर्मचारी आणि कष्टकरी वर्गाच्या बाजूने भूमिका घेत नाहीत. त्यामुळे समाजवादी विचारांच्या संघटनांनी एकत्र येणे काळाची गरज आहे,असे ठाम मत मांडले.

या बैठकीत अनेक नामवंत कामगार नेते आणि संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. हिंद मजदूर किसान पंचायतचे महासचिव सुभाष मळवी, म्युनिसिपल कर्मचारी संघटनेचे नेते ॲड. सुरेश ठाकूर, प्राध्यापक संघटनेच्या नेत्या ताप्ती मुखोपाध्याय, मधू परांजपे, दी म्युनिसिपल युनियनचे रमाकांत बने, नवी मुंबई लेबर युनियनचे प्रफुल्ल म्हात्रे, म्युनिसिपल मजदूर युनियनचे कर्नल चंद्रशेखर रानडे, अनिल जाधव, म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशनचे रमेश भुतेकर, सफाई कर्मचारी युनियनचे उत्तम गाडे, कर्मचारी घर कामगार संघटनेच्या मधू बिरमोळे यांचा समावेश होता.

त्याचप्रमाणे बेस्ट कामगार संघटनेचे नेते रंगनाथ सातवसे, मुंबई मनपा बहुजन एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशनचे डॉ. कैलास गौड, शिक्षक भारतीचे अशोक बेलसरे, सुभाष मोरे, संगिता पाटील, कल्पना शेंडे, माथाडी युनियनचे अरुण रांजणे, बेस्ट कर्मचारी युनियनचे नितीन पाटील, म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे नवनाथ महाणवर, डोंबिवली म्युनिसिपल मजदूर युनियनचे अरविंद तांबे, ऑल इंडिया मिडिया एम्प्लॉईज असोसिएशनचे राजेंद्र दळवी, रेल मजदूर युनियनचे राजेंद्र सिंह, बँक कर्मचाऱ्यांचे नेते प्रकाश लोखंडे, मुंबई मनपा कर्मचारी नेते देविदास लोखंडे, अरविंद सावला आणि छात्र भारतीचे अध्यक्ष रोहित ढाले हे देखील बैठकीस उपस्थित होते.

या सर्व मान्यवरांचा विशेष सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कामगार, शेतकरी, शिक्षक, बँक कर्मचारी, मिडिया क्षेत्र आणि विद्यार्थी यांना एकत्र आणणारी ही बैठक कामगार चळवळीच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरू शकते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# पाकसोबत तणाव आणि मॉक ड्रिल

पाकिस्तानसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने अनेक राज्यांना ७ मे रोजी मॉक ड्रिल करण्यास सांगितले आहे. यामध्ये, नागरिकांना हल्ल्यादरम्यान स्वतःचे संरक्षण करण्याचे प्रशिक्षण दिले जाईल. युद्धाच्या परिस्थितीत लोकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी हे केले जात आहे.

-------------------



देशात अशा प्रकारचा शेवटचा मॉक ड्रिल १९७१ मध्ये घेण्यात आला होता. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झाले. ही मॉक ड्रिल युद्धादरम्यान झाली. तथापि, पंजाबमधील फिरोजपूर कॅन्टोन्मेंटमध्ये रविवार-सोमवार रात्री ब्लॅकआउट सराव करण्यात आला. या काळात, गावे आणि परिसरात रात्री ९ ते ९:३० वाजेपर्यंत वीज बंद होती.

वास्तविक, २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये एक मोठा दहशतवादी हल्ला झाला, ज्यामध्ये २६ जणांचा मृत्यू झाला. यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. सरकारला कोणत्याही संभाव्य धोक्यापूर्वी तयारी करायची आहे.

**मॉक ड्रिल व ब्लॅकआउट रिहर्सल**

मॉक ड्रिल ही एक प्रकारची प्रॅक्टिस आहे ज्यामध्ये आपण पाहतो की जर एखादी आपत्कालीन परिस्थिती (जसे की हवाई हल्ला किंवा बॉम्ब हल्ला) झाला, तर सामान्य लोक आणि प्रशासन किती लवकर प्रतिक्रिया देतात.

ब्लॅकआउट रिहर्सल म्हणजे संपूर्ण परिसरातील दिवे ठराविक काळासाठी बंद करणे. जर शत्रू देशाने हल्ला केला, तर अंधारात परिसर कसा सुरक्षित ठेवता येईल हे दाखवणे हा त्याचा उद्देश आहे. यामुळे शत्रूला लक्ष्य करणे कठीण होते.

ब्रिटनपासून अमेरिकेपर्यंत, अशा मॉक ड्रिल्स केल्या गेल्या आहेत.

**१९५२: 'डक अँड कव्हर' मॉक ड्रिल**

अणुहल्ल्याच्या भीतीने अमेरिकेने १४ जून १९५२ रोजी पहिला देशव्यापी नागरी संरक्षण सराव केला. त्याचे नाव 'डक अँड कव्हर' असे ठेवण्यात आले. यामध्ये, शाळा आणि सार्वजनिक संस्थांमध्ये अलर्ट सायरन वाजवून, मुलांना आणि नागरिकांना टेबलाखाली डोके लपवून आणि तळहाताने डोके झाकून 'डकिंग' करण्याचा सराव करायला लावण्यात आला. त्याचा उद्देश अणुहल्ल्याची शक्यता असल्यास स्वतःचे संरक्षण करणे हा होता. अमेरिकेने १९६२ मध्येही असाच एक मॉक ड्रिल आयोजित केला होता.

**१९४२: कॅनडामध्ये 'इफ डे' ड्रिल**

दुसऱ्या महायुद्धादरम्यान १९ फेब्रुवारी १९४२ रोजी कॅनडाच्या मॅनिटोबा शहरात 'इफ डे' साजरा करण्यात आला. त्यात एका बनावट नाझी हल्ल्याचे नाट्यमय चित्रण करण्यात आले.

काही लोकांना 'देशद्रोही' समजून तात्पुरते ताब्यात ठेवण्यात आले. शहरात सायरन वाजवण्यात आले आणि दिवे बंद करण्यात आले. यामुळे नागरिकांना अंधारात सुरक्षित राहण्याचे प्रशिक्षण मिळाले.

**१९८०: 'स्क्वेअर लेग' ड्रिल**

११ ते २५ सप्टेंबर १९८० दरम्यान ब्रिटनमध्ये स्क्वेअर लेग नावाचा एक क्षेत्रीय सराव आयोजित करण्यात आला होता. या काळात, सरकारने १५० अणुबॉम्ब डागले गेले होते आणि त्यानुसार ते तयार केले गेले होते असे मानले. लोकांना धोक्याची तात्काळ सूचना देण्यासाठी देशभरात हवाई हल्ल्याचे सायरन वाजवण्यात आले.

शत्रूला लक्ष्य करणे कठीण व्हावे, म्हणून सर्व अनावश्यक दिवे बंद (ब्लॅकआउट) करण्यात आले. या सरावातून हे दिसून आले की युद्धाच्या वेळी आणि आणीबाणीच्या वेळी ब्रिटन नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी किती तयार आहे.

**आज देशभरात मॉक ड्रिल**

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, आज ७ मे रोजी देशातील २४४ भागात युद्धात टिकून राहण्याच्या तंत्रांवर मॉक ड्रिल आयोजित केले जातील. गृह मंत्रालयाने या भागांना नागरी संरक्षण जिल्हे म्हणून सूचीबद्ध केले आहे. हे सामान्य प्रशासकीय जिल्ह्यांपेक्षा वेगळे आहेत.

नागरी संरक्षण जिल्हे त्यांच्या संवेदनशीलतेनुसार ३ श्रेणींमध्ये विभागले गेले आहेत. श्रेणी-१ सर्वात संवेदनशील आहे आणि श्रेणी-३ कमी संवेदनशील आहे. ५ मे रोजी गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना मॉक ड्रिल करण्याचे आदेश जारी केले होते.

आज दिल्लीतील गृह मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मॉक ड्रिलच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. राज्यांचे मुख्य सचिव आणि नागरी संरक्षण प्रमुखांसह उच्चपदस्थ अधिकारी त्यात उपस्थित होते.

गृह मंत्रालयाने मंगळवारी मॉक ड्रिल आयोजित केल्या जाणाऱ्या जिल्ह्यांची यादी जाहीर केली. यामध्ये, राज्यनिहाय संवेदनशीलतेच्या आधारावर जिल्ह्यांची विभागणी करण्यात आली आहे. देशातील २५ राज्यांमधील एकूण २४४ नागरी संरक्षण जिल्ह्यांना श्रेणी-१ ते ३ दरम्यान ठेवण्यात आले आहे.

खरं तर, गृह मंत्रालयाने देशातील एकूण ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २५९ नागरी संरक्षण जिल्हे निर्माण केले आहेत. हे नागरी संरक्षण जिल्हे सामान्य प्रशासकीय जिल्हे असण्याची गरज नाही.

उत्तर प्रदेशात एकूण १९ नागरी संरक्षण जिल्हे निर्माण करण्यात आले आहेत. यामध्ये कानपूर, लखनौ, मथुरा सारखे प्रशासकीय जिल्हे आणि लखनौ आणि सहारनपूरमध्ये असलेले बक्षी-का-तलाब, सर्वसा सारखे क्षेत्र समाविष्ट आहेत. येथे एक हवाई दलाचे तळ आहे.

एकूण २५९ नागरी संरक्षण जिल्ह्यांचे महत्त्व किंवा संवेदनशीलतेनुसार ३ श्रेणींमध्ये विभाजन करण्यात आले आहे. श्रेणी १ मध्ये सर्वात संवेदनशील जिल्ह्यांचा समावेश आहे. असे एकूण १३ जिल्हे आहेत. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशात फक्त १ जिल्हा - बुलंदशहर हा श्रेणी १ मध्ये आहे कारण येथे नरोरा अणुऊर्जा प्रकल्प आहे. त्याचप्रमाणे, श्रेणी २ मध्ये २०१ जिल्हे आणि श्रेणी ३ मध्ये ४५ जिल्हे आहेत.

७ मे रोजी देशभरात मॉक ड्रिल होणार आहे. यापूर्वी, युद्धादरम्यान टिकून राहण्यासाठी लखनौ, श्रीनगर आणि मुंबईत पोलिस, एसडीआरएफ आणि इतर बचाव पथकांना प्रशिक्षण दिले जात आहे. देशात अशा प्रकारचा शेवटचा मॉक ड्रिल १९७१ मध्ये घेण्यात आला होता. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झाले. ही मॉक ड्रिल युद्धादरम्यान झाली.

तथापि, पंजाबमधील फिरोजपूर कॅन्टोन्मेंटमध्ये रविवार-सोमवार रात्री ब्लॅकआउट सराव करण्यात आला. या काळात, गावे आणि परिसरात रात्री ९ ते ९:३० वाजेपर्यंत वीज बंद होती.

■ ■ ■

# पाकिस्तानची मजबुरी!

पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर हे जरी वाह्यात वक्तव्ये करत असले तरी ते मनातून घाबरलेले आहेत. त्यांच्या घाबरण्याला कारणेही अनेक आहेत. भारतासारख्या लष्करीदृष्ट्या प्रबळ देशासमोर, पाकिस्तानचा फार काळ टिकाव लागणार नाही, ही गोष्ट त्यांना पुरेपूर माहिती आहे.१९६५,१९७१ आणि १९९९ (कारगिल) या युध्दांमध्ये पाकिस्तानची काय हालत झाली हे त्यांना ठाऊक आहे.

या घडीला जर भारत- पाकिस्तान यांच्यात युध्द झाले तर, पाकिस्तानला एकही गोष्ट अनुकूल दिसत नाही. आर्थिकदृष्ट्या पाकिस्तान, दिवाळखोरीत गेले आहे. आर्थिक मदतीसाठी ते इंटरनॅशनल मॉनेटरी फंड (आयएमएफ) वर बऱ्याच अंशी अवलंबून आहेत. आयएमएफ च्या जाचक अटींमुळे ते हैराण झाले आहेत.

बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वा या प्रांतातील अतिरेक्यांच्या सततच्या घातपाती कारवायांमुळे, पाकिस्तानी प्रशासन आणि लष्कर यांची झोप उडाली आहे. बलुचिस्तान मध्ये तर रोजच बलुचिस्तान लिबरेशन आर्मी आणि इतर बंडखोर संघटनांकडून पाकिस्तानी सैनिक आणि पोलिस यांच्यावर हल्ले केले जात आहेत.

मध्यंतरी बलुचिस्तान लिबरेशन आर्मीच्या बंडखोरांनी जाफर एक्सप्रेसचे अपहरण केले आणि त्यातील प्रवाशांना ओलिस ठेवले.या प्रकरणी तर पाकिस्तानची गुप्तहेर संघटना इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सची इज्जतच गेली.त्याचप्रमाणे पाकिस्तान मधील सामान्य नागरिकांचा पाकिस्तानी लष्कर आणि पोलिस यांच्यावरील विश्वासच उडाला.



अभय गोखले

बलुचिस्तानमध्ये तर परिस्थिती इतकी वाईट आहे की पाकिस्तानी लष्कर आणि पोलिस यांचा तेथे वचकच राहिलेला नाही. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानच्या नॅशनल असेंब्लीचे एक सदस्य फजलूर रेहमान यांनी असे वक्तव्य केले होते की बलुचिस्तान मध्ये परिस्थिती इतकी बिघडली आहे की काही जिल्ह्यांमध्ये पाकिस्तानी सुरक्षा दलांचे अस्तित्वच उरलेले नाही.

या जिल्ह्यांवर बंडखोरांनी पूर्ण ताबा मिळवला असून, त्यांनी तेथे स्वातंत्र्य घोषित केले तर युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन ( युनो ) त्याला लगेच मान्यता देऊ शकेल.

बलुचिस्तान मधील बंडखोरांचे एक नेते अख्तर मेंगल यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांना त्यांची औकातच दाखवली आहे.असीम मुनीर यांनी मध्यंतरी बलुचिस्तान मधील बंडखोरांना धमकी दिली होती. ते म्हणाले होते की हे बंडखोर पाकिस्तानचे काही वाकडे करू शकणार नाहीत. त्यांना आम्ही असा धडा शिकवू की त्यांच्या अनेक पिढ्या तो धडा विसरणार नाहीत.

बलुचिस्तान हे पाकिस्तानच्या छतावरील झुंबर आहे. बलुचीस्तानला पाकिस्तान पासून अलग करण्याचे बंडखोरांचे मनसुबे, पाकिस्तानी लष्कर कधीही सफल होऊन देणार नाही असे असीम मुनीर यांनी बंडखोरांना ठणकावले. यावर अख्तर मेंगल यांनी असे उत्तर दिले की बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामात पाकिस्तानी लष्कराची जी मानहानी झाली, त्याकडे मुनीर यांनी लक्ष द्यावे.

पाकिस्तानचे ९३००० सैनिक तेव्हा भारतीय लष्कराला शरण गेले. एवढ्या मोठ्या प्रमाणात एखाद्या देशाचे सैनिक जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच शरण गेले असतील आणि हा मानहानीचा सोहळा संपूर्ण जगाने टिव्हीवर पाहिला.

अख्तर मेंगल म्हणाले की शरण गेलेल्या पाकिस्तानी सैनिकांची शस्त्रे जिथे टांगून ठेवली होती तिथे त्यांच्या पॅंटही टांगून ठेवल्या होत्या, ही गोष्ट पाकिस्तानी लष्कराने विसरता कामा नये. पाकिस्तानचा जो मानहानीकारक पराभव झाला तो तुमच्या किती पिढ्यांच्या लक्षात राहिल, याचाही विचार करा, असे प्रत्युत्तर मेंगल यांनी मुनीर यांना दिले.

तिकडे पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा या प्रांतातील परिस्थितीही पाकिस्तानी लष्कराच्या हातातून निसटत चालली आहे. तेहरिके तालिबान पाकिस्तान आणि स्वात तालिबान या अतिरेकी संघटनांनी त्या भागात घातपाती कारवाया चालवल्या असून पाकिस्तानी सुरक्षा दलांना त्यांनी त्राही भगवान करुन सोडले आहे.

या संघटनांचे भूत पाकिस्ताननेच निर्माण केले, ते आता पाकिस्तानच्या मानगुटीवर बसले आहे. फेडरली ॲडमिनिस्टर्ड ट्रायबल एरिया (फाटा) या प्रदेशाचा खैबर पख्तुनख्वा या प्रांतात समावेश करताना तेथील अतिरेक्यांना पाकिस्तानी सुरक्षा दलांनी पाकिस्तान बाहेर हाकलून दिले होते. आता ते अतिरेकी अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर करून खैबर पख्तुनख्वा प्रांतात दहशतवादी कारवाया करत आहेत.

एकंदरीत पाकिस्तानी लष्कराला देशांतर्गत दहशतवादी कारवायांना तोंड देताना नाकीनऊ येत आहेत, अशा परिस्थितीत भारत आणि पाकिस्तान यांच्यात युध्द झाल्यास पाकिस्तानची काय दयनीय अवस्था होईल याचा अंदाज कोणीही बांधू शकेल.

■ ■ ■

# तपासाच्या नावाखाली हत्या नको

२२ एप्रिल रोजी बैसरन खोऱ्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर माजी मुख्यमंत्री आणि पीडीपी प्रमुख मेहबूबा मुफ्ती सोमवार, ५ मे रोजी पहलगाम येथे पोहोचल्या. त्यांनी स्थानिक लोकांची भेट घेतली. हल्ल्याव्यतिरिक्त त्यांनी आतापर्यंत केलेल्या तपासाशी संबंधित प्रश्नांची आणि देशात काश्मिरींविरुद्ध निर्माण झालेल्या वातावरणाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे दिली. ४ मे रोजी कुलगाम येथील संशयित ओव्हरग्राउंड वर्कर इम्तियाज अहमद याच्या मृत्यूवरही प्रश्न उपस्थित केले.

पोलिस आणि तपास यंत्रणांनी एक व्हिडिओ जारी केला आहे ज्यामध्ये त्याने नदीत उडी मारून बुडून मृत्यू झाल्याचा दावा केला आहे. मेहबूबा म्हणतात की यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. तपासाच्या नावाखाली होणारे खून थांबवले पाहिजेत.

या हल्ल्यामुळे पहलगामच्या लोकांना सर्वात जास्त त्रास सहन करावा लागला आहे. त्यांनी वर्षानुवर्षे आपल्या बंधुत्वाची परंपरा जिवंत ठेवली आहे. येथे दहशतवाद शिगेला पोहोचला असतानाही अमरनाथ यात्रा सुरूच होती. लोक त्यांना खांद्यावर घेऊन जात असत. जेव्हा जेव्हा कोणाला त्रास व्हायचा तेव्हा ते त्यांच्या घरात ठेवायचे.

आता या घटनेने आपल्या सर्वांचे हृदय हादरवून टाकले आहे. सगळेच दुःखी आहेत. मलाही धक्का बसला आहे. आणि भीतीदेखील आहे कारण अटकेचे वातावरण सुरू झाले आहे, असे त्या म्हणाल्या.

विचार करा, ज्यांनी एखाद्याला वाचवण्यासाठी आपले रक्त दिले, पर्यटकांसाठी वाहने मोफत केली, हॉटेल्स मोफत केली, ते मदत करणारे आणि दहशतवाद्यांमध्ये फरक करत नाहीत. दहशतवाद्यांनी गोळीबार केला आणि तिथे चहा आणि शाल विकणाऱ्या गरीब लोकांना चौकशीसाठी पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले. संध्याकाळपर्यंत ते बंद ठेवले. आणखी अनेक लोकांना ताब्यात घेण्यात आले आहे. म्हणून, मला असे वाटते की कुठेतरी खोलवर, काश्मिरी लोकांचे हृदय दुखावले आहे, अशा शब्दात त्यांनी कारवाईवर नाराजी प्रकट केली.

आज येथे सर्वजण उघडपणे देशासोबत एकत्र आले आहेत. आम्ही संपावरही गेलो आणि निषेधही केला. मग त्यांना प्रश्न पडतो की आमच्याशी असे का वागले जात आहे. तपास संस्थांनी, माध्यमांनी, त्यांनी संपूर्ण देशाला हा संदेश दिला पाहिजे की आपल्याला दहशतवादाविरुद्ध लढायचे आहे



आणि सामान्य काश्मिरींना वाचवायचे आहे, अशी भावनाही व्यक्त केली.

पर्यटकांवर हल्ला होण्याची ही पहिलीच वेळ आहे. तपासात पाकिस्तानचा कट उघडकीस येत आहे. याबद्दल त्या म्हणतात, सध्या तपास सुरू आहे. कट कोणी रचला आणि का रचला हे मी कसे सांगू? आपण कोणालाही दोष देऊ शकत नाही. आता प्रश्न असाही उद्भवतो की जिथे हल्ला झाला तिथे बैसरन व्हॅलीपासून फक्त ३ किमी अंतरावर एक आर्मी कॅम्प होता, मग ते काय करत होते? जर तुम्ही एकमेकांवर दोषारोप करायला सुरुवात केली तर आपले लक्ष दुसरीकडे वळेल.

हल्लेखोरांना स्थानिकांचा पाठिंबा असल्याचा संशय डॉ. फारुख अब्दुल्ला यांनी व्यक्त केला होता. यावर मेहबूबा मुफ्ती म्हणतात, फारुख साहेबांचे विधान एक नेता म्हणून आणि एक काश्मिरी म्हणून अतिशय दुर्दैवी विधान होते. फारुख साहेबांच्या विधानानंतर काश्मीरमध्ये अधिकाधिक लोकांची अटक सुरू झाल्याचे मला अनेकांनी सांगितले.

जेव्हा एखादा नेता असे निष्काळजी विधान करतो तेव्हा त्याचा संदेश संपूर्ण देशात जातो. काश्मिरी शाल घातलेल्या या माणसाने त्याला मारहाण केली. हे वेगळेदेखील असू शकते, कारण फारुख साहेब म्हणाले होते की त्यात स्थानिक समाविष्ट असू शकतात.

आता कल्पना करा, अशा घटनेत एक किंवा दोन स्थानिक लोक सामील असतील. संपूर्ण काश्मीरचा समावेश होणार नाही. म्हणून, माज्या मते, फारुख साहेबांचे ते विधान बरोबर नव्हते. त्यांनी असे विधान करायला नको होते.

४ जणांनी एवढा मोठा अपघात घडवून आणला. पण त्यांना पाठिंबा देण्यासाठी हजारो लोक असू शकत नाहीत. हा एक मोठा अन्याय आहे. आतापर्यंत दोन हत्या झाल्या आहेत. ओव्हरग्राउंड वर्कर्स स्वतःच्या मर्जीने येत नाहीत. तुम्ही त्यांना पोलिस स्टेशनला बोलावतात, मग ते जातात. लष्करी छावणीला फोन केला की ते निघून जातात.

दोन मिनिटांसाठी असे गृहीत धरू की तो एक ओव्हरग्राउंड वर्कर आहे. सर्वप्रथम, तुमच्याकडे कोणताही पुरावा नाही. जर पुरावे असतील तर ते न्यायालयात सादर करा. त्याला तुरुंगात पाठवा. आपल्यातील हजारो तरुण कोणत्याही पुराव्याशिवाय तुरुंगात बंद आहेत. मग असे म्हटले जाते की तो एका चकमकीत मारला गेला. नाहीतर त्याने नदीत उडी मारली. ही गोष्ट विश्वास ठेवण्यासारखी नाही.

पहलगाम हल्ल्यानंतर पहिल्यांदाच काश्मीरमधील लोक निषेध करण्यासाठी लाल चौकात पोहोचले. काश्मीरमध्ये हा मोठा बदल असून, या बदलामागे मीच आहे. मी पहिला फोन केला. येथील लोकांना बंद पाळायचा होता आणि निषेध करायचा होता, पण ते कसे करायचे याबद्दल गोंधळलेले होते. मी फोन केला आणि रस्त्यावर निघाले. मग लोक रस्त्यावर उतरले. बंद करण्याच्या माज्या आवाहनावर, इतर लोकांनीही तो मुद्दा बनवला.

■ ■ ■


# दोन राष्ट्रगीतांचे जनक ; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ मे, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला.

त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली.

वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हें. १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला.

गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली.



वीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला.

रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला.

बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो.

एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

■ ■ ■

## यांना पाकिस्तानात हाकला!

**वाचक लिहितात**

पहलगाम हल्ल्यानंतर एक धक्कादायक सत्य समोर आले आहे. एका अहवालानुसार भारतातील अनेक मुलींनी पाकिस्तानी मुलांशी लग्न केले आहे तर अनेक पाकिस्तानी मुलींनी भारतीय मुलांशी लग्न केले आहे.

सानिया मिर्झा आणि सीमा हैदर ही त्यांतील माहीत असलेली उदाहरणे. ही संख्या थोडीथोडकी नसून काही लाखांच्या घरात आहे. पाकिस्तानी तरुणांशी निकाह झाल्यानंतरही या विवाहित स्त्रिया त्यांच्या मुलांसह भारतातच राहात आहेत, येथील सरकारी सोयी सुविधांचा लाभ घेत आहेत. यांच्याकडे आणि यांच्या मुलाबाळाकडेही भारताचे आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदान कार्ड आणि पासपोर्ट यांसारखी भारतीय कागदपत्रे आहेत.

वर्षानुवर्षे भारतात राहणारी ही मंडळी आज भारत सोडायला तयार नाहीत. त्यांच्याकडे भारतीय नागरिकत्वाची कागदपत्रे असल्याने सुरक्षा यंत्रणानाही यांच्यावर कारवाई करण्यात अडचणी येत आहेत.

भारतातील सुख सुविधांचा बिनदिक्कतपणे लाभ घेणाऱ्या या महिलांचे इमान नक्की भारताशी आहे की पाकिस्तानशी? जर भारताशी आहें तर भारतात यांना सुयोग्य वर सापडलेच नाहीत का?

आई वडिलांचे गुण त्यांच्या अपत्यांमध्ये येत असतात असे विज्ञान सांगते. याचा अर्थ जी धर्मांधता, कट्टरता आणि भारतद्वेष पाकिस्तान्यांमध्ये असतो तो यांच्या अपत्यामध्येही उतरला असणार.

त्यामुळे लव्ह जिहाद, लँड जिहादप्रमाणे या सर्व गोष्टीमागे कोणता जिहाद कार्यरत आहे का याचाही शोध घेणे आवश्यक आहे. आजतागायत भारतात जे आतंकवादी हल्ले झाले त्यामध्ये या सर्वांचा कुठे हात होता का याचाही शोध घेणे गरजेचे असून नाहक भावनेच्या आहारी जाऊन ही विषवल्ली भारतात पोसण्याऐवजी त्यांना पाकिस्तानात हाकलणेच देशाच्या भल्याचे आहे.

■ श्रीमती लीना मकरंद गाडगीळ

## उन्हाळा आणि लिंबूपाणी



उन्हाळ्यात शरीरामधील पाण्याची मात्रा कमी होते ज्यामुळे चक्कर येणे आणि उष्मघाताच्या समस्या होतात. यासाठी शरीराला हायड्रेटेड ठेवणे महत्त्वाचे असून, दररोज दिवसभरातून ७-८ लिटर पाणी पिण्याची गरज असते. उन्हाळा सुरू होताच, बहुतेक घरांमध्ये लिंबूपाणी बनवायला सुरुवात होते.

उन्हाळ्यात लिंबू पाणी प्यायल्यामुळे तुम्हाला हायड्रेटेड ठेवण्यास मदत करतेच आणि शरीरातील व्हिटॅमिन सीची कमतरता देखील दूर करते. घशाला ओलावा देण्याव्यतिरिक्त, ते शरीराला थंड करते आणि आतून ऊर्जा प्रदान करते. लिंबू पाणी प्यायल्यामुळे आरोग्यासह त्वचेसाठी देखील फायदेशीर ठरते. नियमित लिंबू पाण्याचे सेवन केल्यामुळे निरोगी राहाण्यास आणि चमकदार त्वचा मिळण्यास मदत करते.

लिंबू पाणी योग्य प्रकारे कसे बनवायचे हे जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. या क्रमात, लिंबूपाणी बनवताना लोक अनेकदा चुका करतात. बाजारातून आणलेले लिंबू न धुता थेट कापले तर त्यावरील धूळ आणि कीटकनाशके त्यांच्या आत शोषली जातात. यामुळे पोट बिघडू शकते किंवा अन्नातून विषबाधा होण्याचा धोका असतो.

लिंबू पाण्याने चांगले धुवावे आणि शक्य असल्यास कोमट पाणी वापरावे. कधीकधी लोक सकाळी कापलेले लिंबू फ्रिजमध्ये ठेवतात आणि संध्याकाळी तेच वापरतात. पण हे करणे योग्य नाही. कापलेल्या लिंबूमध्ये बॅक्टेरिया लवकर वाढतात, ज्यामुळे लिंबू पाणी पिल्यानंतर गॅस, उलट्या किंवा जुलाब सारख्या समस्या उद्भवू शकतात.

लिंबू पाणी संतुलित असेल तरच ते आरोग्यदायी असते. जास्त साखर टाकल्याने ते एका प्रकारच्या सरबतमध्ये बदलते, ज्यामुळे वजन वाढू शकते. त्याच वेळी, जास्त मीठ टाकल्याने रक्तदाब वाढू शकतो. म्हणून, ते चवीनुसार घाला, कमी किंवा जास्तही नाही. लोक अनेकदा लिंबूपाणी बाटलीत साठवतात, परंतु जर बाटली किंवा काच व्यवस्थित स्वच्छ केली नाही तर त्यात असलेले बॅक्टेरिया लिंबूपाणी खराब करू शकतात. यामुळे पोटदुखी किंवा ॲसिडिटी होऊ शकते. जर लिंबूपाणी बनवून काही तास बाहेर टेबलावर ठेवले तर त्यात बॅक्टेरिया वाढू लागतात, विशेषतः उन्हाळ्यात. यामुळे, लिंबू पाणी आंबट होऊ शकते आणि ते पिल्याने तुम्ही आजारी पडू शकता.

**नेहमी ताजे बनवा किंवा फ्रिजमध्ये ठेवा.**

लिंबू पाणी पचन सुधारण्यास मदत करते आणि गॅसेसची समस्या कमी करते. लिंबू पाण्याचे सेवन केल्याने भूक नियंत्रणात राहते आणि वजन कमी करण्यास मदत होते. लिंबू पाण्याचे सेवन केल्याने किडनी स्टोन होण्याचा धोका कमी होतो. लिंबू पाणी त्वचेतील कोलेजन वाढवते आणि त्वचेला निरोगी ठेवण्यास मदत करते. नियमित लिंबू पाणी पिण्याने शरीर हायड्रेटेड राहते. लिंबू पाण्याचे सेवन केल्याने शरीर निरोगी राहते आणि आजारांशी लढण्यास मदत होते. लिंबू पाणी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### मुलीच अव्वल..

मुलीच परिक्षेत मारतात बाजी
याचा घेता मागोवा
पालकांच्या दृष्टीतील बदल
याला कारणीभुत दिसतो वा..

मुलींवर असते नियंत्रण
मुलांना देती झुकते माप
ते वेळेचा करती अपव्यय
रिझल्ट वर परिणाम
आपोआप..

प्राधान्यक्रम कशाला देतो
यावर अवलंबुन असते सारे
निगेटीव्ह निष्कर्ष काढुनी
वाढवु नका ईर्षा द्वेष रे..!

महासागर भंडारा
रविवार ०४मे २०२५
पान ६

## स्मार्ट ग्रामपंचायत खैरी वलमाझरी येथे लोकसेवा हक्क दिन

**साकोली, दि. ०३ मे :** स्मार्ट गटग्रामपंचायत खैरी वलमाझरी येथे लोकसेवा हक्क दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी लोकांच्या निःस्वार्थ सेवेची शपथ घेण्यात आली. याप्रसंगी सरपंच पुरूषोत्तम उपसरपंच रूखमोडे, सत्यपाल मरसकोल्हे, ग्रामपंचायत अधिकारी नरेश शिवनकर, तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानेश्वर रामटेके, पोलीस पाटील शंकर कापगते वलमाझरी, अजय घरडे खैरी, उमराव भलावी पिटेझरी, सर्व ग्रामपंचायत सदस्य व महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.



# पूरग्रस्त कथित घोटाळ्यात महसूल सेवक निलंबित !

### तलाठी, पोलीस पाटीलचा प्रस्ताव सादर, महसूल विभागात खळबळ, दोन सदस्य समितीचे गठन

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा, दि. ०३मे :** सप्टेंबर २०२४ मध्ये वैनगंगा नदीचे पुराचे पाणी सुकळी नकुल आणि गोंडीटोला गावाचे शेतात शिरले होते. महसूल विभागाचे पथकाने नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे याद्या तयार केलेल्या होत्या. या यादीत शेती नसलेल्या शेतकऱ्यांचे नावाचे समावेश करण्यात आले होते.

महसूल सेवाकांचे पत्नीचे नाव यादीत आल्याने जाणीवपूर्वक नावाचे समावेश केल्याप्रकरणी बिनाखी तलाठी साझा क्रमांक ११ चे महसूल सेवक महेश बिसने यांना निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय दोन सदस्य समितीने तलाठी आणि पोलीस पाटीलांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठविला असल्याची माहिती मिळाली आहे.

सुकळी नकुल आणि गोंडीटोला गावाचे शिवारात वैनगंगा नदीचे पुराचे पाणी सप्टेंबर २०२४ मध्ये शिरले होते. धान पिकांचे प्रचंड नुकसान झाले होते.

बिनाखी तलाठी साझा क्रमांक ११ चे तलाठी हिरकन्या शेंडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या याद्या तयार केलेल्या होत्या. या यादीत मोठा घोळ झाला असल्याचे निदर्शनास आले होते. ज्या शेतकऱ्यांचे नावे शेतीच नाही. अशा शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी पात्र करण्यात आले होते. बहुतांश शेतकऱ्यांचे नावे ०. १० आर शेती असताना त्यांना ४२ हजार २०० रुपयाची आर्थिक मदत देण्यात आली असल्याचा ठपका गावातील तक्रारदारांनी ठेवला होता.

गावातील पोलीस पाटील यांच्या पत्नीचे नावे शेती नसताना आर्थिक मदत देण्यात आली आहे. नंतर तक्रारी वाढल्याने पोलीस पाटीलानी आर्थिक मदत शासनाला परत केली आहे.

दरम्यान बिगर नावाने आर्थिक मदत मंजूर झाली असताना पोलीस पाटीलानी पत्नीच्या नावे केव्हायसी केली.

यात शासन स्तरावर देण्यात येणाऱ्या निधीची लूट करण्याचे प्रयत्न असल्याचे दिसून आले आहे. यामुळे पोलीस पाटीलावर कारवाईचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आला असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान बिनाखी तलाठी साझ्याचे तलाठी हिरकन्या शेंडे यांनी पूरग्रस्त शेतकऱ्यांचे याद्या तयार केलेल्या आहेत.

यात ६ बोगस शेतकऱ्यांचे नावे आढळून आले आहेत. त्यांचे खात्यात आर्थिक मदत जमा झाली असून शासनाला निधी परत केला आहे. असे असले तरी यादीत बोगस नावाचा समावेश जाणीवपूर्वक करण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

पूरग्रस्त शेतकऱ्याचा घोटाळा १५ लाखाचे घरात असल्याने गावात आरोप प्रत्यारोप सुरु झाले. प्रकरण पोलीस ठाण्यात पोहचले आहे. या घोटाळ्यावरून गावात भांडणे विकोपाला गेले असल्याचे दिसून आले आहेत.

दरम्यान पूरग्रस्त कथित घोटाळा वृत्तपत्रांनी मालिका प्रकाशित करीत चव्हाट्यावर आणले आहे. यानंतर दोन सदस्य समितीचे गठन करण्यात आले आहे. बिनाखी तलाठी साझ्यात महसूल सेवक पदावर कार्यरत असताना सुकळी नकुल गावांत शेती नसताना स्वतः चे पत्नीचे नाव यादीत घातले. शासन स्तरावरून दिली जाणारी आर्थिक मदत घेतली. प्रकरण अंगलट येणार असल्याचे निदर्शनास येताच महसूल सेवक महेश बिसने यांनी आर्थिक मदत ४३, २०० रुपये शासनाला परत केली आहे.

पूरग्रस्त शेतकऱ्यांचे यादीत जाणीवपूर्वक पत्नीच्या नावाचा समावेश केल्याचा ठपका चौकशी समितीने अहवालात ठेवला आहे. यानंतर तहसीलदारांनी २५ एप्रिलला महसूल सेवक महेश बिसने यांना निलंबित केले आहे. याशिवाय तलाठी आणि पोलीस पाटील यांचे विरोधात कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठविण्यात आलेला असल्याची माहिती मिळाली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांचे कारवाईकडे गावाकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

***समितीचे प्रमुख नायब तहसीलदार***

सुकळी नकुल आणि गोंडीटोला गावात पूरग्रस्ताचे मदत वाटपात कथित घोटाळा झाला. बोगस शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आल्यानंतर चौकशीसाठी शेतकरी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे तालुकाध्यक्ष जितेंद्र तूरकर यांनी आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर समिती गठीत करण्यात आली.

यात नायब तहसीलदार बी. एम. पेंदाम आणि मंडळ अधिकारी पी. टी. सतदेवे यांचा समावेश करण्यात आला असून घोटाळ्यात पहिली कारवाई करण्यात आली आहे. महसूल सेवक निलंबित झाला असल्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या संपाची सिओनी घेतली दखल

### निवेदनावर सविस्तर चर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा, दि. ०३मे :** भंडारा जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी पुकारलेल्या दोन दिवसीय संपाची भंडारा जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश नंदागवळी यांनी दखल घेत शिष्टमंडळाला पाचरण करून १० मागण्यांच्या निवेदनावर शिष्टमंडळाबरोबर सविस्तर चर्चा केली. शासन स्तरावरील मागण्या आम्ही शासनाकडे पाठविल्या आहेत. जिल्हास्तरावरील मागण्या संबंधात बोलतांना उमेश नंदागवळी म्हणाले. १५ एप्रिल रोजी शासना कडून आलेल्या पत्रान्वये निधीची रक्कम २१ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेला प्राप्त झाली आहे आणि ती रक्कम आम्ही सातही पंचायत समिती कडे ३० एप्रिल रोजी वळती केली आहे. आणी एरियसची रक्कम आज २ मे रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत वळती करणार असल्याचेही शिष्टमंडळाशी बोलतानी म्हणाले. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिका व जिल्हा परिषद कर्मचाऱ्या प्रमाणे वेतन श्रेणी लागू करण्यात यावी, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देण्यात यावे, कर्मचाऱ्यांना उपदान लागू करण्यात यावे, भविष्य निर्वाह निधीची रक्कम कामगार भविष्य कार्यालयात जमा करण्यात यावी, वसुलीची अट रद्द करण्यात यावी, आकृती बंधात सुधारणा करण्यात यावी, रिक्त पदाच्या १० टक्के पदभरती करण्यात यावी तसेच एरियस व थकीत वेतनाची रक्कम त्वरित देण्यात यावी या मागणीसाठी १व २ मे रोजी जिल्हा कार्याध्यक्ष रामलाल बिसेन, जिल्हाध्यक्ष मारुती चेतुले, जिल्हा सचिव माणिक लांबट, विभागीय सचिव हेमराज वाघाडे, राज्य संघटक राजेश दिवटे व कडू ठलाल यांच्या नेतृत्वात संपाची हाक लगावण्यात आली होती. उपमुख्य कार्यकारी अधिकारी उमेश नंदा गवळी व शिष्ट मंडळाबरोबर सविस्तर चर्चा करण्यात आली यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष रामलाल बिसेन, जिल्हाध्यक्ष मारुती चेटुले, जिल्हा सचिव माणिक लांबट, संतोष पंचबुद्धे, सेरु चमट, संदीप बनकर, ज्ञानेश्वर मेश्राम, सुनील माकडे, सचिन आकरे, मुकेश भुरे, सुखदेव मारबदे, ओमदेव लांजेवार, मनोहर मानकर, शेखर रहांगडाले व अविनाश मेश्राम उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली, दि.०३ मे :** अकॅडमिक हाईटस पब्लिक स्कुल (एकोडी रोड) साकोली येथे दि.१ मे २०२५ गुरूवार ला महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन हर्ष उल्हासात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.ज्योतीबा फुले, यांच्या प्रतिमेसमोर दिपप्रज्वलन करून ध्वजारोहण समर्पण बहुउद्देशीय विकास संस्थेचे संस्थापक डॉ.राजेश चंदवानी यांच्या हस्ते तर प्रमुख अतिथी प्राचार्या डॉ.संचिता ब्रम्हचारी, शाळा व्यवस्थापक जी. एच. ठाकरे, डॉ.अमितोज कौर, यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून सर्व शिक्षकवृंद ह्यांनी महाराष्ट्र दिनावर आधारित 'जय जय महाराष्ट्र माझा' गौरवगिताचे सादरीकरण केले तर संचिता ब्रम्हचारी ह्यांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा देवून आपल्या वक्तव्यात म्हटले की. महाराष्ट्राची मायबोली मराठी, मराठी मन, मराठी अस्मिता आजतागायत अबाधित ठेवण्यासाठी महाराष्ट्राला अनेक संत, महात्म्यांनी, साहित्यिक आणि कवींनी मराठी भाषेला समृद्ध केले. अशाप्रकारे परिसंवादात बोलताना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केतन हत्तीमारे, अतुल नंदेश्वर, मृनाली कोसे, धनराज मेश्राम, निखिल निंबेंकर, निशिकांत माटुरकर, मनोजकुमार पेटकचले, शेहबाज खान, सारिका ठाकरे, नंदा कापगते, छाया राऊत, ममता सरोदे, दिक्षा गेडाम, निशा रामटेके, श्रृनाली जंवजाळ, योगिता भेंडारकर, लता कटरे, प्रिती धुर्वे, पुनम वाडिभस्मे ह्यांनी सहकार्य केले. संचालन शिवाली गुप्ता ह्यांनी केले तर आभार प्रदर्शन मोहन रहिमतकर ह्यांनी केले.

# नाईक विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

### ध्वजारोहणानंतर कार्यक्रमाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली, दि.०३ मे :** स्थानीय वसंतराव नाईक विद्यालय, चांदोरी/ उसगाव येथे एक मे महाराष्ट्र दिन निमित्त ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व संचालक मनोहर रावजी राकडे, समितीचे उपाध्यक्ष जागेश्वर कावळे, मुख्याध्यापक रामकृष्ण हारगुडे, दर्शन कटकवार, मनीषा काशीवार, क्रीडा संघटक शाहेद कुरेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत मनोहर रावजी राकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले ध्वज संचालन, राष्ट्रगान, व जय जय महाराष्ट्र माझा या महाराष्ट्र गीताचे संचालन कुरेशी यांनी केले.



महाराष्ट्र दिन व कामगार दिन कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या हॉलमध्ये करण्यात आले.

मुख्याध्यापक हारगुडे यांनी आपल्या प्रास्ताविकेतून महाराष्ट्राची निर्मिती, पहिले मुख्यमंत्री यांच्या विषयी माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राखडे यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण ते हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. वर्ग पाच चा विद्यार्थी अमन हातझाडे याने महाराष्ट्र दिनाविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाला मिथिलेश चांदेवार, मनीषा हातझाडे यांनी सहकार्य केले कार्यक्रमाचे संचालन शाहेद कुरैशी व आभार अश्विनी राजूरकर यांनी मानले.

# परदेश शिष्यवृत्ती योजना सन २०२५-२६ ची प्रक्रिया सुरू

### अर्ज करण्याचे समाज कल्याण विभागाचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा, दि.०३ मे :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रती वर्षी अनुसूचित जाती, प्रवर्गातील ७५ विद्यार्थ्यांना (मुला-मुलीना) परदेशामध्ये अध्ययन करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाची अत्यंत महत्वाची योजना असून सन २००३ पासुन राबविली जात आहे. अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशात पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पी.एच.डी.) अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होय. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची प्रक्रीया सुरू झाली असून विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहे. त्यासंबंधीची जाहिरात नुकतीच प्रसिद्ध झाली असून विद्यार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदर योजनेंतर्गत महाराष्ट्रातील अनूसूचित जातीच्या प्रवर्गातील पदव्युत्तर पदवी आणि पी.एच.डी.साठी अद्ययावत (Qx World University Ranking) २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यापैकी ३०टक्के जागावर मुलींची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरील ताज्या घडमोडी या लिंकवरुन डाऊनलोड करुन घ्यावा. व सदर परिपूर्ण भरलेले अर्ज https://fs.maharashtra.gov.in या वेबसाइटवर वाचनीय व सुस्पष्ट कागदपत्रे ऑनलाईन सादर करुन त्याची सुस्पष्ट प्रिंट, ऑफलाईन नमून्यातील अर्जासोबत समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयास सादर करावी. अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक ३०/०४/२०२५ असा असेल.

सदर योजनेसाठी पात्र असण्याऱ्या विद्यार्थ्यांना विमान प्रवास भाडे, परदेशातील शैक्षणिक संस्थेची शिक्षण फी, निर्वाह भत्ता, आकस्मिक खर्च याचा लाभ मिळणार आहेत.

पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्ष व पीएचडीसाठी ४० वर्ष ही कमाल वयोमर्यादा असेल. भारतीय आयुविज्ञान परिषदेच्या संकेतस्तळावरील MD व MS अभ्यासक्रमच प्रवेशासाठी पात्र असतील. अधिक माहितीसाठी संकेतस्थळास भेट द्यावी. सदर योजनेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन श्री.ओम प्रकाश बकोरिया, आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच श्री.बाबासाहेब देशमुख, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर यांनी केले आहे.

# आर्टस् कॉलेज, सिहोरा येथे '१ मे महाराष्ट्र दिन' साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा, दि. ०३ मे :** स्थानिक आर्टस् कॉलेज सिहोरा येथे ६५ वा '१ मे महाराष्ट्र दिनानिमित्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम' साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन चापले यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थाध्यक्ष दिलीपराव सोमनाथे प्रमुख अतिथी म्हणून प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. जयकुमार क्षिरसागर यांनी कार्यक्रमाचे संचालन करून राष्ट्रध्वजाला सलामी दिली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. मदन प्रधान, डॉ. मनोज सरोदे, डॉ. चंद्रशेखर भेजे, अविनाश हेडावू, कार्तीक टेभूर्णे, प्रकाश उके, राजकुमार गभणे, मनसुरलाल मरस्कोल्हे, कु. शारदा वैरागडे, श्रीमती सोनाली कुंभलकर हे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच वरील दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने श्रीनगर येथील पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्यात शहीद झालेल्या भारतीय नागरीकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# टेक वारीतून होणार तंत्रज्ञानाचा जागर

***राज्यातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे 'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' हा ५ ते ९ मे २०२५ दरम्यान आयोजित केला आहे त्यानिमित्त ... विशेष लेख***

बदल हा निसर्गाचा नियम आहे त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात काळानुरूप बदल स्वीकारत काम करणे आवश्यक असते. हे काम त्या काळाला अनुरूप असेल तर ते अधिक गतीमान होते.

प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना प्रशासकीय कामामध्ये कुशलता वाढवून कामांची गुणवत्ता वाढवणे, समाजाप्रती आपले उत्तरदायित्व जोपासणे, कमी कालावधीत अधिक अचूक काम करणे व लोकाभिमुख असणे ही काळाची गरज आहे.

आज काळानुरुप तंत्रज्ञानात आणि आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत झपाट्याने बदल होत आहे. हे लक्षात घेता प्रशासकीय अधिकारी यांना या प्रशिक्षणातून गतीमानतेने प्रशासकीय कामकाज व्हावे, काम करत असताना येणाऱ्या ताण - तणावाचे व्यवस्थापन याबाबीचे मार्गदर्शन मिळत राहणे गरजेचे आहे यातून तणावरहित कार्यपद्धती आत्मसात करणे शक्य होते त्यातून कामाप्रती असलेली बांधिलकी जपली जाते आणि लोकसेवेच्या व्यापक भावनेतून ,प्रशासकीय कामकाजात अधिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शासन वेळोवेळी अनेक उपक्रम राबवत असते.

हेच लक्षात घेवून केंद्र शासनाच्या Integrated Government online Training (iGOT) प्रणालीवर उपलब्ध असलेले प्रशिक्षण राज्यातील अधिकारी यांनी घ्यावेत यासाठी सामान्य प्रशासन विभागाने सर्व विभागांना सूचना केल्या आहेत.

**आधुनिक तंत्रज्ञान व नवीन कल्पनांचा संगम**

महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी राज्य शासनातर्फे 'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' हा ५ ते ९ मे २०२५ दरम्यान आयोजित केला आहे.

महाराष्ट्र शासन आयोजित आधुनिक तंत्रज्ञान व नवीन कल्पनांचा संगम असलेली टेक वारी म्हणजे पहिली डिजिटल वारी असून टेक वारी ही मंत्रालयातून सुरू होऊन महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या कानाकोपऱ्यात तंत्रज्ञानाचा प्रसार करुन त्यामधून आधुनिक तंत्रस्नेही महाराष्ट्र घडविण्याची सुरुवात आहे. –अपर मुख्य सचिव व्ही. राधा, सामान्य प्रशासन विभाग.

'टेक वारी' मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, सायबर सुरक्षा इत्यादी तंत्रज्ञानाबाबत सत्रे तसेच तणाव व्यवस्थापन, आरोग्यदायी जीवनशैली, ध्यानधारणा याबाबतच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगण आणि परिषद सभागृह सातवा मजला येथे विविध व्याख्यांनाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच विविध क्षेत्रातील २४ स्टार्टअप्सचे सादरीकरण होणार असून निवड झालेल्या कल्पनांना १५ लाख रूपयांची मदत दिली जाणार आहे.

'टेक वारी' म्हणजे काय तर (TECH-WARI) म्हणजे (Wisdom through wellness and Work-life Balance) निरोगीपणा आणि जीवनातील कामकाज संतुलन, (Awareness of Emerging technologies) उदयोन्मुख तंत्रज्ञानाची माहिती व जनजागृती, (Reform in Governance Practices) प्रशासनाच्या कामकाजात अधिक गतीमानता आणणे, (Informed and Inclusive Workforce) जाणकार आणि समावेशक कुशल अधिकारी व कर्मचारी यासाठी प्रयत्न करणे यासाठी टेक वारी असे या कार्यक्रमाला नाव देण्यात आले आहे.

आय गॉट पूॅटफॉर्मवर महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

केंद्र शासनाच्या आय गॉट (iGOT) प्रणालीवर विविध क्षेत्रांतील प्रशिक्षणे उपलब्ध आहेत. हे प्रशिक्षण मिशन कर्मयोगी अंतर्गत विकसित केलेले आहे, जे सरकारी कर्मचाऱ्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी आहे.

आय गॉट मध्ये वेगवेगळ्या विषयांवर आधारित ऑनलाइन प्रशिक्षण मॉड्यूल्स उपलब्ध आहेत.

आय गॉट मध्ये प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रमाणपत्र दिले जाते, जे सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकाला जोडले जाणार आहे. १०० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत सामान्य प्रशासन विभागाने केंद्र शासनाच्या आय गॉट प्रणालीवर तीन महिन्यात राज्यात ९ हजारावरून ५ लाख कर्मचाऱ्याची नोंदणी केली आहे. आय गॉट पूॅटफॉर्मवर महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

टेकवारी असेल अथवा आय गॉट प्रणाली शासनातील अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या व्यस्त दिनचर्येतून स्वयंविकासासाठी असलेले हे व्यासपीठ शासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वैयक्तिक विकासासोबतच त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवा अधिक लोकाभिमुख होतील.

महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या आस्थापनातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी आय गॉट वर जरूर प्रशिक्षण घ्यावेच सोबत टेक वारीतही सक्रीय सहभाग नोंदवण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडून सर्वांना आवाहन करण्यात आले आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा**

# ब्लॉसम इंग्लिश स्कूल चा विद्यार्थी धीरज ने 'बर्ड सेवर टॉवर प्रोजेक्ट' केला तयार

*** जिल्हाधिकारींनी घेतली दखल * १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून गटविकास अधिकारी व मा. गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते सत्कार**



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली भंडारा, दि. ०३ मे :** ब्लाजम इंग्लिश स्कूल साकोली/ शेंदुरवाफा येथे सातव्या वर्गात शिकत असलेला धिरज कांचनजी बोरकर सेंदूरवाफा याने 'बर्ड सेवर टावर प्रोजेक्ट' हा प्रयोग तयार केला. जिल्हाधिकारी भंडारा यांच्या समोर हा प्रोजेक्ट दाखविण्यात आला.

साहेबांनी प्रयोगाचे कौतुक केले आणि त्याचा प्रयोग राष्ट्रीय पातळीवर नेण्याचे निर्देश दिले. तसेच त्याच्या या कामगीरी बद्दल १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून तहसील कार्यालय साकोली येथे मा गटविकास अधिकारी जाधव आणि मा गटशिक्षणाधिकारी विजय आदमने व मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाल्यानंतर धिरज बोरकर याचे सन्मान करण्यात आले.

त्याने तयार केलेला प्रोजेक्ट 'बर्ड सेवर टावर' हा प्रोजेक्ट पक्ष्यांना वाचविण्या करीता बनवल्या गेला आहे. हया प्रयोगाच्या सानिध्यात पक्षी आले की ऐंटिना वर जातो आणि तिथेच स्थिर होतात आणि पक्षी खालून निघून जातात. पुन्हा पक्षी आले की, एंटीना खाली येतात, आणि तितच स्थिर होतात आणि वरून पक्षी निघून जातात.

पक्षी टावरच्या ऐंटीनाच्या रेडिएशन म्हणजे मॅग्नेटिक फिल्ड चुंबकीय मृत्यु काही दिवसा नंतर ओळावते असे होऊ नये म्हणून हा प्रयोग तयार करण्यात आलेला आहे. आजच्या परिस्थितीत वातावरणात विविध कंपनीचे मोबाईल टावर, इंटरनेटच्या अत्याधिक वापर यामुळे वातावरणातून पशु-पक्षी नाहीसे झालेले आहेत. पशुपक्ष्यांचे रक्षण करण्यासाठी सातव्या वर्गातील धीरज ने तयार केलेला 'बर्ड सेवर टावर' या पक्ष्यांना वाचविण्यासाठी खूप उपयोगी होईल. त्याच्या या प्रयोगाचे दखल जिल्हाधिकारी भंडारा यांनी घेतली. ब्लॉसम इंग्लिश स्कूलचे संचालक अश्विन नशिने, प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षिका व पालक वर्ग यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

RNI No.- MAHAMAR-2010/35801
महासागर भंडारा
मालक, मुद्रक, प्रकाशक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय

## मुले-महिलांमध्ये अशक्तपणा अधिक

अशक्तपणा म्हणजे रक्ताची कमतरता. ही एक समस्या असून देशातील अनेक महिला आणि मुलांवर तिचा परिणाम दिसतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, भारतात सहा ते ५९ महिने वयोगटातील ५३ टक्क्यांपेक्षा जास्त मुले आणि अनेक स्त्रिया ॲनिमियाने ग्रस्त असल्याचे समजते.

राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण २०१९-२१ नुसार, देशातील ५७ टक्के महिला अशक्त आहेत. ॲनिमिया असणाऱ्या व्यक्तीच्या शरीरात हिमोग्लोबिनची कमतरता असते. हिमोग्लोबिन हे रक्तातील प्रथिने असून ते शरीराच्या प्रत्येक भागाला ऑक्सिजन पुरवते. असे असताना ते कमी झाल्यास थकवा, अशक्तपणा, चक्कर येणे आणि श्वास लागणे यासारख्या समस्या उद्भवू लागतात.

महिलांना अशक्तपणाचा धोका का?

* मासिक पाळी दरम्यान जास्त रक्तस्त्राव होत असल्यामुळे महिलांच्या शरीरात लोहाची कमतरता भासू शकते

* गर्भधारणेदरम्यान आणि स्तनपान करताना स्त्रीचे शरीर स्वतःसाठी तसेच बाळासाठी रक्त तयार करते. त्यामुळे लोहाची गरज वाढते.

* बहुतेक महिलांना सकस आहार मिळत नाही. शरीराचे आवश्यक पोषण न झालेल्या महिला ॲनिमियाच्या बळी ठरतात.

* अविवेकी आहारामुळे शरीरात आवश्यक खनिजांची कमतरता निर्माण झाल्यामुळेही अशक्तपणा जाणवू शकतो.

जाणून घ्या
**डॉ. मेघा दळे**

मुलांमध्ये अशक्तपणाची कारणे

* लहान मुले फक्त दुधावर अवलंबून असतील तर त्यांना पुरेसे लोह मिळत नाही आणि हा आजार होतो.

* अयोग्य आहारपद्धतीमध्ये मुलांना चॉकलेट आणि स्नॅक्स मुबलक प्रमाणात मिळतात पण लोह आणि फॉलिक ॲसिडयुक्त अन्न कमी मिळते. परिणामी ही समस्या डोके वर काढते.

* मूल वाढते तसतसे शरीराला अधिक लोहाची आवश्यक असते. मात्र अन्नातून ते मिळत नसल्यास कमतरतेमुळे ही समस्या उद्भवते.

लक्षणे काय?

सतत जाणवणारा थकवा, चेहऱ्यावरील



फिकटपणा, चक्कर येणे, श्वास लागणे, कशावरही लक्ष केंद्रित न होणे, नखे तुटणे, केस गळणे ही या आजाराचे लक्षणे आहेत.

अशक्तपणा टाळण्यासाठी उपाय

लोहयुक्त पदार्थ खा. पालक, बीटरूट, डाळिंब, गूळ, कडधान्ये, सुका मेवा, सोया, मासे आणि अंडी यांचा आहारात समावेश करा. व्हिटॅमिन सी युक्त आहार घ्या. त्यासाठी लिंबू, संत्री, आवळा यांचा आहारात समावेश करा. त्यामुळे शरीरात लोह लवकर शोषले जाते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार लोह आणि फॉलिक ॲसिडच्या गोळ्या घ्या. विशेषतः गर्भधारणेदरम्यान याचे महत्त्वाचे आहे. सतत थकवा किंवा दम लागत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने रक्ताची तपासणी करून घ्या. मुलांना सकस अन्न खाण्याची सवय लावा. त्यांच्या आहारात हिरव्या भाज्या, धान्ये आणि फळांचा समावेश करा.

## लग्नानंतर जोडप्यात नैराश्य का?

लग्न एकत्र राहण्याची, आनंद वाटून घेण्याची आणि एकमेकांना समजून घेण्याची सात वचने असतात. पण अनेक जोडप्यांचे लग्नानंतरचे आयुष्य अवघड होऊन बसते. खरे तर लग्नानंतर सर्व काही परफेक्ट व्हायला हवे; पण अचानक तुमचा मूड खराब होतो, छोट्या छोट्या गोष्टींवरून चिडचिड होते किंवा एकटेपणा जाणवतो तेव्हा समजून घ्या, की हे लग्नानंतरचे नैराश्य आहे.

लग्नानंतरच्या नैराश्याची कारणे

* जबाबदाऱ्यांमध्ये अचानक वाढः लग्नानंतर दोघांनाही घर सांभाळणे, आर्थिक नियोजन, नातेवाईकांशी समन्वय साधणे इत्यादी अनेक जबाबदाऱ्यांना सामोरे जावे लागते. यातून नैराश्य येते.

* वैयक्तिक स्वातंत्र्य गमावणेः लग्नानंतर जीवनशैलीत बदल होतो. उशिरा झोपणे, मित्र-मैत्रिणींना भेटणे किंवा स्वतः साठी वेळ काढणे कमी होते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला प्रतिबंधित वाटू शकते.

* जोडीदाराकडून अपेक्षा आणि वास्तव यातील फरकः काही जोडप्यांना लग्नाआधी एकमेकांकडून खूप अपेक्षा असतात. पण लग्नानंतर परिस्थिती तशी झाली नाही तर निराशा वाढू शकते. अपेक्षापूर्ती अभावी नात्यात कटुता, नैराश्य यासारख्या समस्या उद्भवू शकतात.



* मानसिक अंतरः अनेक वेळा जोडपी आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करत नाहीत. त्यामुळे गोष्टी मनात साचत राहतात आणि तणाव वाढतो.

* नवीन कुटुंबाशी जुळवून घेण्याचे आव्हानः विशेषत: महिलांसाठी नवीन कुटुंब, नवीन चालीरीती आणि वेगळ्या वातावरणाशी जुळवून घेणे सोपे नाही. त्यामुळे मानसिक समस्यांमध्ये वाढ होऊ शकते. कधी कधी हीच बाब नैराश्याचे रूप घेते.

आरोग्यविशेष
**डॉ. कुंदन गायकवाड**

नैराश्य टाळण्यासाठी टिप्स

* हे टाळण्यासाठी स्पष्ट संभाषण ठेवा. मनातील भावना जोडीदाराशी शेअर करा. काय चांगले वाटते, काय वाईट वाटते यावर उघडपणे सांगा. त्यामुळे गैरसमज टाळता येतील.

* थोडा 'मी टाइम' देखील आवश्यक असतो. लग्न म्हणजे तुम्ही ओळख गमावणे असा होत नाही. तेव्हा पुस्तक वाचणे, फिरायला जाणे, योगासने करणे सुरू ठेवा. स्वतःसाठी आवर्जून वेळ काढा.

* एकमेकांची प्रशंसा करा. छोट्या-छोट्या गोष्टींसाठी जोडीदाराचे कौतुक करणे गरजेचे आहे. यामुळे नाते मजबूत होते आणि सकारात्मक ऊर्जा राहते.

* आठवड्यातून एकदा डेटची योजना करा. चित्रपट पाहा. बाहेर जेवा किंवा एकत्र काहीतरी नवीन करा. यामुळे कंटाळा येणार नाही.

## ...म्हणून प्रतिजैविकांचा परिणाम शून्य

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अँटीबायोटिक्स घेत असाल तर काळजी घ्या कारण प्रतिजैविक प्रतिरोधकतेमुळे जगभरात ३० लाखाहून अधिक मुलांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. व्हिएन्ना येथे सादर केलेल्या एका संशोधनातून ही बाब उघड झाली आहे. दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेसारख्या देशांमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या प्रतिजैविकांच्या वापरावरही या संशोधनाने चिंता व्यक्त केली आहे.


२०१९ ते २०२१ दरम्यान दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेत प्रतिजैविकांचा वापर झपाट्याने वाढल्याचे सदर संशोधनात म्हटले आहे. या काळात दक्षिण पूर्व आशियामध्ये १६० टक्के तर आफ्रिकेत १२६ टक्के वाढ झाली आहे. दुसरीकडे राखीव प्रतिजैविकांचा

आरोग्यचर्चा
**डॉ. अजेय गर्जे**

वापर दक्षिण पूर्व आशियामध्ये ४५ टक्के आणि आफ्रिकेत १२५ टक्क्यांनी वाढला आहे. प्रतिजैविकांचा हा वाढता वापर गंभीर चिंतेची बाब आहे. लोक स्वेच्छेने अँटिबायोटिक्स घेत आहेत. त्यामुळे अँटी-मायक्रोबियल रेझिस्टन्सही झपाट्याने वाढत आहे.

प्रतिजैविक प्रतिकार म्हणजे काय?

कोणत्याही रोगास कारणीभूत असणारे जीवाणू आणि विषाणू स्वत:मध्ये प्रतिजैविकांना प्रतिकार करण्याची क्षमता विकसित करतात. परिणामस्वरुप त्या जिवाणू वा विषाणूने संक्रमित रुग्णावर उपचार करणे अत्यंत कठीण होते. यामुळे जगभरात ३० लाखांहून अधिक मुलांचा मृत्यू झाला असल्याचे ही जागतिक आकडेवारी सांगते. असे असले तरी हा प्रतिकार मोडून काढण्यासाठी औषधांचा विकास संथ गतीने होत आहे. त्यामुळेच दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेसारख्या देशांमध्ये परिस्थिती अशीच राहिली तर परिणाम अत्यंत भीषण होऊ शकतात.




सल्ल्याशिवाय अँटिबायोटिक्स टाळा

संशोधनात म्हटले आहे की, राखीव प्रतिजैविके उपचारांच्या पहिल्या टप्प्यासाठी नाहीत. ही औषधे फक्त आणीबाणीसाठी ठेवावीत. स्वतः मनाने अँटिबायोटिक्स घेतात त्यांनी ही सवय त्वरित सोडली पाहिजे. प्रतिजैविक घेण्याचे काही नियम आहेत. ते पाळले नाहीत तर रुग्णाच्या शरीरातील जिवाणू आणि विषाणू स्वत:मध्ये प्रतिरोधक क्षमता विकसित करतात. अशा परिस्थितीत भविष्यात रुग्णाला असाच आजार झाला तर उपचार करणे कठीण होते.

प्रतिजैविक गोळ्या खाल्याने पोटात दुखणे, उलटी आणि अतिसार यांचा समावेश आहे. त्यामुळे भविष्यात संसर्गावर उपचार करणे कठीण होऊ शकते.

## आता पाहायला मिळतोय मधुमेहाचा टाईप-५

आजकाल मधुमेहामुळे तरुण वयातही अनेकांना नानाविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मधुमेहाचे टाइप-१ आणि टाइप-२ असे दोन प्रकार असतात हे आपण जाणतो. परंतु या दोन मधुमेहाव्यतिरिक्त लोकांना टाइप ५ नावाच्या



मधुमेहाचाही त्रास होऊ शकतो. नुकतेच मधुमेहाबाबत संशोधन करणाऱ्या 'वर्ल्ड काँग्रेस ऑफ डायबिटीज २०२५' ने टाइप-५ नामक मधुमेहाच्या नवीन स्वरूपाची घोषणा केली आहे. एक जागतिक टास्क फोर्स या दुर्मीळ स्थितीची तपासणी करत असून हा प्रकार टाइप-१ आणि टाइप- २ मधुमेहापेक्षा खूप वेगळा असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

आरोग्यभान
**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

'इटरनॅशनल डायबेटीज फडरेशन'चे अध्यक्ष प्रोफेसर पीटर श्वार्झ यांनी बँकॉकमध्ये आयोजित झालेल्या एका चर्चासत्रात याची घोषणा केली. टाइप-५ मधुमेह कमी वजन असणाऱ्या लोकांना प्रभावित करतो. त्याचबरोबर कुटुंबात मधुमेहाचा कोणताही इतिहास नसणाऱ्या तसेच टाइप-१ किंवा टाइप -२ मधुमेहाची सामान्य लक्षणे नसणाऱ्यांनाही हा मधुमेह होण्याची शक्यता असते.

महत्त्वाचा फरक

टाइप-५ मधुमेह असणारे लोक सामान्यतः कमी वजनाचे असतात. या लोकांमध्ये इन्सुलिनची कमतरता असते तसेच ते इन्सुलिन प्रतिरोधकही असते. हा एक महत्त्वाचा फरक म्हणावा लागेल. म्हणजेच शरीर पुरेसे इन्सुलिन तयार करतही करत नाही आणि इन्सुलिनच्या क्रियेला प्रतिकारही करते. म्हणूनच मधुमेहाचा हा प्रकार अधिक त्रासदायक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## पोटावर झोपणे टाळा


दिवसभर दमछाक झाल्यानंतर घरी आल्यावर बिछान्यात पडून लोळावंसं वाटतं. आपण अक्षरश: आडवे पडतो. कसेही झोपतो. पण यामुळे पाठीच्या कण्याला त्रास होऊन पाठीचं किंवा मानेचं दुखणं उद्भवू शकतं. त्यामुळे आपल्या शारीरिक स्थितीकडे नेहमी लक्ष द्यायला हवं. आपण वेगवेगळ्या स्थितीत झोपतो. याचा परिणाम झोपेवरही होऊ शकतो. मात्र एका ठराविक स्थितीत झोपू नये, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. अनेक जण पोटावर झोपतात. पण असं झोपणं त्रासदायक ठरू शकतं. पोटावर झोपून पुस्तक वाचणं, मोबाईल, लॅपटॉपचा वापर करणं किंवा फक्त झोपणंही पाठ आणि पोटाच्या आरोग्यासाठी घातक आहे.

मध्यंतरी कॉलेजमधल्या मुलांच्या झोपण्याच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला. जवळपास १५ टक्के मुलं पोटावर झोपून लॅपटॉप, मोबाईलचा वापर करत असल्याची बाब यातून समोर आली आहे. पोटावर झोपल्यामुळे पाठीच्या कण्याच्या नैसर्गिक बाकात बदल होऊन पाठ आणि मानेची दुखणी उद्भवू शकतात. इतकंच नाही तर सतत पोटावर झोपल्यामुळे शरीरावर अतिरिक्त ताण येऊन बराच त्रास होऊ शकतो. पोटावर झोपून मोबाईल/लॅपटॉपचा वापर करणाऱ्यांना पाठीची दुखणी त्रास देऊ शकतात, असंही एका संशोधनातून समोर आलं आहे. त्यामुळे अशा स्थितीत झोपणं टाळायला हवं.

## कर्करोगाचा मेंदूवरही परिणाम

कर्करोगाचे निदान होताच बहुतेक लोक त्याच्याशी लढण्याचे धैर्य गमावतात. मात्र चौथ्या टप्प्यातही या आजारावर उपचार करणे शक्य असते, हे लक्षात घ्यायला हवे.

एका संशोधनात समोर आले आहे की, कर्करोग शरीराच्या प्रभावित भागावरच नाही तर मेंदूवरही हल्ला करतो. 'सायन्स मेगॅझिन'मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनात कर्करोगाचा मेंदू आणि मज्जासंस्थेवर कसा परिणाम होतो हे सविस्तर सांगितले आहे. परिणाम शोधण्यासाठी उंदरांवर संशोधन करण्यात आले. सदर संशोधनातून आश्चर्यकारक निष्कर्ष समोर आले. कर्करोगाचा टप्पा वाढत जातो तसतसा हा आजार रुग्णाच्या मनाशी खेळू लागतो, असे या अभ्यासातून समजले.



आरोग्य जपा
**डॉ. सतीश सोनवणे**

कर्करोग काय करतो?

हा आजार रुग्णाची इच्छाशक्ती आणि जगण्याची प्रेरणाच नष्ट करतो. त्यामुळे उपचार आणि योग्य पोषण असूनही रुग्ण अशक्त होतो. त्याची प्रकृती बिघडते. उंदरांवर केलेल्या संशोधनातून दिसून आले आहे की, कर्करोग मेंदूच्या विशिष्ट भागातील मज्जासंस्थेवर वाईट परिणाम करतो. या संशोधनासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि उपकरणे वापरण्यात आली. ही उपकरणे संपूर्ण मेंदूची प्रतिमा बनवू शकतात आणि मेंदूतील सूक्ष्म हालचालींचेही अचूक निरीक्षण करू शकतात.

संशोधनात काय?

संशोधनात आढळल्यानुसार कर्करोग वाढत गेला तसतसे उंदरांनी अन्न मिळवण्याचे प्रयत्न कमी केले. अवघड कामे पूर्णपणे बंद झाली. मज्जासंस्थेद्वारे मेंदूमध्ये तयार होणाऱ्या डोपामाइन या रसायनाची पातळीही कमी झाल्याचे संशोधनातून समोर आले आहे. हे रसायन प्रेरणा स्त्रोत असून ते एखाद्या व्यक्तीमध्ये इच्छाशक्ती जागृत करते. कर्करोगाच्या चौथ्या टप्प्यातील उपचारादरम्यान रुग्ण जगण्याची आशा गमावून बसतो, असे या संशोधनातून समोर आले आहे. म्हणूनच उपचार योग्य दिशेने सुरू असतानाही तो प्रतिसाद देत नाही आणि मृत्यू स्वीकारतो. सुरुवातीला ही प्रदीर्घ आजारामुळे झालेली मानसिक स्थिती मानली जात होती. परंतु संशोधनानंतर स्पष्ट झाले की कर्करोग शरीरावरच नव्हे तर मनावरही हल्ला करतो आणि रुग्णाची जगण्याची इच्छाच नष्ट करतो.

नवसंशोधन

### भारतीयांचा मेंदू लहान

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन अँड टेक्नॉलॉजी हैदराबादच्या शास्त्रज्ञांनी भारतीयांच्या मेंदूचा नकाशा तयार केला आहे. हा अशाप्रकारचा पहिलावहिला नकाशा आहे. भारतीयांचा मेंदूचा आकार इतरांच्या तुलनेत लहान असल्याची बाब या संशोधनातून समोर आली आहे. पाश्चिमात्य देश तसंच पूर्वेकडच्या इतर देशांमधल्या लोकांच्या तुलनेत भारतीयांच्या मेंदूचा आकार बराच लहान असतो. या संशोधनामुळे अल्झायमर तसंच मेंदूशी संबंधित इतर विकारांवरील उपचारांना गती मिळू शकते.



या प्रस्तावावर काम करणाऱ्या सेंटर फॉर व्ह्युजअल इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे जयंत सिवास्वामी यांच्या मते, मेंदूशी संबंधित आजार शोधण्यासाठी मॉन्ट्रियल न्यूरॉलॉजिकल इन्स्टिट्यूट (MNI) टेम्पलेटचा उपयोग केला जातो.

दंतारोग्य

### दात पांढरेशुभ्र होतात का?

दातांचा पांढरेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रक्रिया केल्या जातात. दातांचा पिवळेपणा दूर करणाऱ्या प्रक्रियेबाबत बरेच गैरसमज आहेत. या प्रक्रियेनंतर दात पांढरेशुभ्र होतात, असा समज असतो. मात्र या प्रक्रियेचे लाभ व्यक्तीगणिक बदलत जातात. दागांचे प्रकार, दातांवरच्या एनामेलचा थर, दातांची क्षमता यावर बरंच काही अवलंबून असतं. त्यामुळे दात पूर्ण पांढरे होतीलच असं नाही.



केळ्याच्या सालीमध्ये मोठ्या प्रमाणात पोटॅशियलम, मॅग्नेशियम असते. या गोष्टीचा उपयोग ब्लिचिंग एजंट म्हणून करण्यात येऊ शकतो. त्यामुळे केळ्याचे साल दातांवर घाऊसू शकता.

डोळ्यांचे आरोग्य

### डोळे दुखत असतील तर...

लॅपटॉप आणि कॉम्प्युटरचा वापर केल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. डोळे दुखू लागतात. मात्र काही उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो. सतत स्क्रीनपुढे राहिल्याने डोळे दुखू लागले तर डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारावे. योगामुळेही आराम मिळू शकतो. आहारात डाळी, हिरव्या भाज्या, गाजर यांचा समावेश असावा. स्क्रीन टाईम मर्यादित करा आणि मध्ये ब्रेक घ्या. अश्रू निर्माण करण्यासाठी चांगले हायड्रेटेड वापरा.



वाचताना किंवा डिजिटल उपकरणे वापरताना योग्य प्रकाशयोजना सुनिश्चित करा. उन्हाळ्यात योग्य सनग्लासेस वापरा.

आजीबाईचा बटवा

### शिळी पोळी आहे गुणकारी

शिळ्या किंवा उरलेल्या पोळ्यांची फोडणीची पोळी केली जाते. मात्र बऱ्याच घरांमध्ये अशा उरलेल्या पोळ्या टाकून दिल्या जातात. अर्थात या शिळ्या पोळ्या अधिक लाभदायी ठरतात. शिळ्या पोळ्यांमध्ये विविध आजार बरे करण्याची क्षमता असते. या पोळ्यांमध्ये ताज्या पोळ्यांच्या तुलनेत प्रथिनांचं प्रमाणही अधिक असतं. शिळ्या पोळ्यांमुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात रहाते. मधुमेहींना सकाळच्या वेळी दुधासोबत शिळी पोळी खाता येईल. शिळ्या पोळीच्या सेवनामुळे रक्तदाबही नियंत्रणात रहातो. त्यामुळे शिळी पोळी टाकून देऊ नये. पचनक्रियेसाठी शिळी पोळी खूप फायदेशीर आहे. गॅस, पोट फुगणे या पोटाशी संबंधित समस्यांवर रामबाण उपाय आहे.



# अजित पवारांचा पगार अडीच लाख....
# मजुरांना केवळ दोनशेची वाढ

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ६ :

आपल्या देशाची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकाची असल्याचे सांगितले जाते. पण गावात राहणाऱ्या लोकांना अजूनही हक्काचे घर मिळाले नाही. शेतमालाला भाव मिळत नाही. रोजगार हमी योजनेत २०१७ मध्ये २०० रुपये प्रतिदिन मजुरी मिळत होती, २०२५ मध्ये फक्त १०० रुपये वाढले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पगार २०१० मध्ये ५५ हजार होता. आता त्यांचे मानधन अडीच लाख रुपये झाले आहे. प्रश्न यावर विचारले गेले पाहिजेत. याची लाज वाटली पाहिजे, पण त्याकडे कुणाचेही लक्ष नाही, अशी टीका प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष, माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मंगळवारी येथे केली.



प्रहार जनशक्ती पक्ष आणि प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेच्या वतीने येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात संताजी धनाजी पुरस्कार वितरण सोहळा आणि विभागीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

बच्चू कडू म्हणाले, अजित पवार आणि इतर मंत्र्यांना अडीच लाख रुपये पगार मिळतो आणि सहाशे रुपये दरमहा दिव्यांगाला मिळत होते, ते केवळ पंधराशे रुपयांपर्यंत वाढवले जातात. याची लाज वाटली पाहिजे. पण, प्रश्न विचारणाऱ्या कार्यकर्त्याला देशोधडीला लावण्याचे काम सुरू आहे.

दिव्यांगांचा उदरनिर्वाह पंधराशे रुपयांत कसा चालत असेल, हा प्रश्न आम्हाला पडत नाही. सर्व राजकीय पक्षांनी आपल्याला जात-धर्मात गुंतवून ठेवले आहे.

बच्चू कडू म्हणाले, गिरता वही है जो रुकता है, बच्चू कडू रुकनेवाली चीज नही, वो दौडनेवाली है, त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे रडगाणे गात राहणे, उपयोगाचे नाही. किती दिवस हा विषय डोक्यात ठेवायचा. आता येणाऱ्या निवडणुका कशा जिंकल्या जातील, ज्यांनी मतांची चोरी केली, ज्यांनी मतांवर दरोडा टाकला, त्यांना आडवे करण्याची खुणगाठ आता बांधली पाहिजे.

इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनच्या माध्यमातून मतांची चोरी करणाऱ्या लोकांना आता धडा शिकवला पाहिजे. भारतात वेगळे वातावरण तयार केले जात आहे. संविधानाची चिरफाड केली जात आहे. जाती-धर्माच्या नावावर संपूर्ण देश हा खऱ्या लढाईपासून दूर केला जात आहे. काल परवा आम्ही यवतमाळला गेलो होतो. तेथे एक घटना कळली. एका बारा वर्षांच्या मुलीला घराजवळील हातपंप दुरूस्त होत नाही, म्हणून तिला पाण्यासाठी नदीवर जावे लागते आणि नदीत बुडून मृत्यू होतो, अशी अवस्था आहे.

## झिरो माईल चौकात वृद्ध महिलेवर
## बलात्कार करून खून

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

गृहमंत्र्यांच्या शहरात महिला व मुलींच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. शहराचे हृदयस्थळ असलेल्या झीरो माईल चौकात एका वृद्ध महिलेवर बलात्कार करुन तिचा खून करण्यात आला.

त्या महिलेचा मृतदेह अगदी झीरोमाईल स्तंभाशेजारीच आढळल्याने पोलिसांच्या कार्यप्रणालीवर संशय निर्माण झाला आहे. ही धक्कादायक घटना मंगळवारी सकाळी ११ वाजता उघडकीस आली. अद्याप महिलेची ओळख पटली नसून या घटनेबाबत अनेक तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.

जवळपास ५५ ते ५८ वर्षे वयोगटातील एक महिला बेसहारा आहे. ती सोमवारी रात्री झीरो माईल स्तंभ चौकात फिरत होती. पावसाने भीजल्यामुळे ती महिला झीरो माईलस्तंभाजळच एका झाडाखाली बसली होती. सोमवारी रात्री दोन पोलीस कर्मचाऱ्यांना ती महिला रस्त्याच्या कडेला बसल्याचे दिसून आले. पोलिसांनी तिला प्यायला पाणी दिले आणि निघून गेले.

मध्यरात्रीनंतर ती महिला झाडाखाली झोपली असता दारु किंवा अंमली पदार्थाच्या नशेत आलेल्या आरोपीने त्या महिलेशी लगट करण्याचा प्रयत्न केला असावा. त्यानंतर तिच्याशी बळजबरीने लैंगिक अत्याचार केला. तिने प्रतिकार केला असता तिचे डोके फरशीचा तुकड्याने ठेचून खून केला असावा. त्यानंतर आरोपीने तेथून पळ काढला. अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मंगळवारी सकाळी एका नागरिकाला रक्ताने माखलेला महिलेचा मृतदेह दिसला. त्याने पोलीस नियंत्रण कक्षाला फोन करुन माहिती दिली. काही वेळानंतर सीताबर्डी पोलिसांचा ताफा घटनास्थळावर पोहचला. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन महिलेचा मृतदेह ताब्यात घेतला.

उत्तरिय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला. या प्रकरणी प्राथमिक माहितीवरुन सीताबर्डी पोलिसांनी हत्याकांडाचा गुन्हा दाखल केला. आरोपीचा शोध घेण्यासाठी दोन पथके तैनात करण्यात आली आहे.

देशाचे केंद्रबिंदू असलेल्या झीरोमाईल चौकात सीसीटीव्ही नसल्याची बाब समोर आली. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि महापालिका प्रशासनाचा हलगर्जीपणा दिसून आला. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद न झाल्यामुळे पोलिसांसमोर नवे आव्हान उभे झाले आहे. मात्र, संविधान चौक आणि मॉरिस कॉलेट टी पॉईंट चौकातील सीसीटीव्हीचे फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणात काही धागा मिळविण्याचा प्रयत्न पोलीस करीत आहेत.

## कार्यकर्त्यांच्या हक्काचे दान पदरात टाकणारा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

तीन वर्षांपासून याच क्षणाची वाट आपण सारे पाहत होतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा निर्णय हा लोकशाही व्यवस्थेला बळकट करणारा आहे, अशी प्रतिक्रिया महसूल मंत्री व नागपूर आणि अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर बावनकुळेंची प्रतिक्रिया



तीन वर्षांपासून याच क्षणाची वाट आपण सारे पाहत होतो. लोकशाही व्यवस्थेला बळकट करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता होणार आहेत. कार्यकर्त्यांच्या हक्काचे दान आज सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या पदरात टाकले. ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी, चौंडी येथे आज महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ आहे. या पावनभूमीत असताना हा निर्णय झाला. मी न्यायालयाचे मनःपूर्वक स्वागत करतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदींजींनी विकसित भारताचा संकल्प केला आहे. आम्ही विकासाच्या मुद्द्यावर महाराष्ट्र पुढे नेत आहोत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायदेपंडितांशी सतत सल्लामसलत केली. आज त्याला यश आले. गेल्याच आठवड्यात जातीनिहाय जनगणना करण्याचा मोठा निर्णय केंद्र सरकारने घेतला. जनतेच्या आशा आकांक्षाना शक्ती देण्याचे काम सरकार व न्यायालयाकडून होत आहे.

येणारी निवडणूक कार्यकर्त्यांची आहे. तन मन धनाने कार्यकर्ते समाजसेवा करत असतात. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू आज नक्कीच फुलले असणार. मी सर्व कार्यकर्त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.अशी प्रतिक्रिया बावनकुळे यांनी दिली

## सरकारवर ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल करा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

विजय वडेट्टीवार यांची मागणी



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी महत्त्वाच्या सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याप्रकरणी महायुती सरकारवर ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. घटनात्मक तरतुदींनुसार दिला जाणारा सामाजिक न्याय विभागाचा निधी अन्यत्र वळवणे हा संविधानाचा अवमान आहे, असे वडेट्टीवार म्हणालेत.

विजय वडेट्टीवार यांनी मंगळवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात ते म्हणाले, सामाजिक न्याय विभागासाठी अर्थसंकल्पात योग्य ती तरतुद करण्याची घटनात्मक तरतुद आहे. त्यानुसार या विभागाला निधी दिला जातो. त्यामुळे हा निधी वळवणे हा संविधानाचा अवमान आहे. एवढेच नाही तर समस्त मागासवर्गीयांना वाऱ्यावर सोडण्याचा प्रयत्न आहे. खरे म्हणजे हा अक्षम्य असा गुन्हा आहे. हा निधी वळवताच येत नाही.

या प्रकरणी सर्वप्रथम सरकारवर ॲट्रोसिटी दाखल केली पाहिजे. हे सरकार महाराष्ट्राच्या गादीवर बसण्याच्या लायक नाही हे आता स्पष्ट झाले आहे.

सत्ता मिळवण्यासाठी वेगवेगळ्या घोषणा करायच्या आणि मागासवर्गीय व आदिवासींचा निधी वळवायचा हे राज्यात पहिल्यांदाच घडत आहे. ही दलितांवर अन्याय करणारी भूमिका असून, सरकारने वळवलेला निधी त्वरित संबंधित खात्याला परत केला पाहिजे, अशी भूमिका वडेट्टीवार यांनी मांडली.

## एमपीएससीच्या पीएसआय परीक्षेत
## आतिश मोरे राज्यात प्रथम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट- ब सेवा मुख्य परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) संवर्गाची तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यात आतिश मोरे यांनी सर्वाधिक गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती देण्यात आली. एमपीएससीने पीएसआय संवर्गातील ३७४ पदांसाठी ५ नोव्हेंबर २०२३ रोजी परीक्षा घेतली होती. उमेदवारांचे निकालाकडे लक्ष लागले होते. त्यानुसार एमपीएससीने सर्वसाधारण गुणवत्ता यादी संकेतस्थळावर जाहीर केली. सर्वसाधारण गुणवत्ता यादी उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहे.

अंतिम निकालापूर्वी पडताळणी केल्यानंतर काही उमेदवारांच्या शिफारशींमध्ये बदल होऊ शकतो. खेळाडू व अनाथ प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून पडताळणीच्या अधीन राहून त्यांचा प्रवर्गाचा दावा तात्पुरता ग्राह्य धरण्यात आला आहे. त्यानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

सर्वसाधारण गुणवत्ता यादी न्यायालयात दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधिन राहून जाहीर करण्यात येत आहे. उमेदवारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर खेळाडू व अनाथ प्रवर्गातील संवर्गाची तात्पुरती निवड जाहीर होईल. या प्रक्रियेनंतर अंतिम गुणवत्ता यादीच्या आधारे उमेदवारांची शिफारशी करण्यात येतील. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध स्पर्धा परीक्षेद्वारे पदभरतीकरता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय उमेदवारांना उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने २६ नोव्हेंबर २०२१ रोजी निर्णय घेतला होता.

## ओबीसींच्या दृष्टीने आनंदाचा दिवस

छगन भुजबळ यांची प्रतिक्रिया

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. ६ :



राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, नगरपालिका यासह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या पुढील चार महिन्यात घेण्यात याव्यात. तसेच ओबीसींचे २७ टक्के राजकीय आरक्षण कायम ठेऊन निवडणूक घेण्यात यावी, असा महत्वपूर्ण निर्णय आज सुप्रीम कोर्टाने दिला आहे.

या निर्णयामुळे आज विशेष आनंद होत आहे. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो, असे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या लढ्याला मोठे यश मिळाले असून सुप्रीम कोर्टाचे आभार मानतो, असेही ते म्हणाले.

: मुलखावेगळी माणसं :

## छंद कात्रणे जमविण्याचा




लोकमानस

व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात तसेच प्रत्येकाच्या स्वभावानुसार त्याच्या आवडीनिवडीही असतात. ज्याचा त्याचा छंद वेगळा असतो. या छंदातून जमविलेल्या वस्तू, साहित्य पुढे त्याचा खजिना बनतो. जुन्या गोष्टींचे मोल जसे कालांतराने वाढत असते. तसेच या छंदातून जमविलेल्या वस्तूंचे, साहित्याचे मोल वाढते. संभाजी नगरच्या भिकनराव म्हात्रे यांना असाच एक छंद आहे. तो म्हणजे वेगवेगळ्या वर्तमानपत्रांत आलेल्या विविध प्रकारच्या चांगल्या बातम्या, फोटो, लेख यांची कात्रणे जमा करून ठेवणे.

गेल्या अनेक वर्षांपासून हा छंद जडला आहे. आता हा छंद कसा जमला ते काही त्यांना आठवत नाही, पण आजमितीस त्यांच्याकडे १०-१२ रजिस्टर, डायऱ्यांमध्ये विविध वर्तमानपत्रांची कात्रणे चिकटवून जमवून ठेवलेली आहेत. कधी कोणते आंदोलन होते त्याची माहिती त्यांनी एकत्रित जमवून ठेवलेली आहे.

दोन वर्षांपूर्वी अण्णा हजारेंचे आंदोलन देशभर चर्चेचा विषय ठरले होते. या आंदोलनाच्या संभाजीनगर वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्यांची कात्रणे काढून त्यांनी जमा करून ठेवली आहेत. ऐतिसासिक वस्तूंवर प्रत्येकच पेपरमध्ये अनेकदा माहिती येत असते. ही माहिती आपल्या ज्ञानात भर घालते.

त्याची छायाचित्रे दुर्मिळ असतात. असे काही दिसले की, ते त्यांच्या कात्रणांच्या संग्रहात हमखास जमा होते.एका सर्वसाधारण कुटुंबात तळवी गावात भिकनराव यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती जेमतेम त्यामुळे चौथीपर्यंत शिक्षण घेतले. त्या शिक्षणाच्या आधारावर औरंगाबाद जिल्हा परिषदेत नोकरी मिळाली. संपूर्ण सेवाकाळात असलेली जबाबदारी पूर्ण आनंदाने, उत्साहाने आणि प्रामाणिकपणे पार पाडली.

नोकरी करीत संसाराचा गाडा हाकत असतानाच वर्तमानपत्रांच्या बातम्यांची कात्रणे जपण्याच्या छंद लागला. शासनाचे चांगले कार्यक्रम, गणेश उत्सवाचे कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम, लोककला उत्सव अशा बातम्या लेखांची कात्रणेही जपून ठेवली आहेत. यासोबतच भजन, किर्तन, नाथांचे भारुड यांचे भानुदासनगरच्या भोलेश्वर भजनी मंडळाकडून कार्यक्रमही करीत असतात.

या सर्व उपक्रमात त्यांचे मित्र रमेश दिसागज यांची नेहमीच मदत होत असते. त्यांच्या भजनी मंडळाच्या आलेल्या सर्व बातम्या संग्रही आहेतच, त्याशिवाय अन्य चांगल्या घडामोडीही संग्रही आहेत. आता हाच त्यांचा खजिना झाला आहे. गेल्या अनेक वर्षांचा हा ठेवा आहे.

सावित्रीबाई फुलेंनी मुलींसाठी पुण्यात देशातली पहिली शाळा सुरू केली आणि पुढे पुढे आपल्या देशातील महिलांनी अनेक शिखरे पादाक्रांत केली. पंतप्रधान, राष्ट्रपतीपदापर्यंत महिला पोहोचल्या. अगदी अवकाशातही त्यांनी झेप घेतली. तरीदेखील मुलींप्रती आपल्या समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन अद्यापही आणखी सुधारणे गरजेचे वाटते. त्यातूनच प्रेरणा घेऊन ह्यबेटी बचावह्न या श्रृंखलेत हा संदेश देणारी अनेक चित्रेही रेखाटली आहेत.

याचे कुठेतरी प्रदर्शन व्हावे असे वाटते. त्यांचा हा संग्रह असाच पुढेही सुरू ठेवण्याचा भिकनराव यांचा मानस आहे.

■ ■ ■

: वाद संवाद :

## दहशतवादाच्या समूळ उच्चाटनासाठी भारत पाक युद्ध व्हावे का?

**अरविंद सामंत, आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक**

○ काश्मीर मधील पेहलगाम मध्ये काही दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर जो अकस्मात हल्ला केला आणि या हल्ल्यात निष्पाप पर्यटक मारले गेले त्यामुळे संपूर्ण देशभरात पाकिस्तान विरुद्ध संतापाची लाट दिसतेय. पाकिस्तानने सुरवातीला या दशतवादी हल्ल्याची निर्लज्ज कबुली दिली मात्र नंतर पलटी मारली.

दहशतवादाला खतपाणी घालणारा आणि प्रोत्साहन देणारा हाच एकमेव देश आहे. त्यामुळेच संपूर्ण जगातून दहशतवादाचे समूळ उच्चाटन का करायचे असेल तर एकदाचे भारत आणि पाक युद्ध व्हायलाच हवे. या युद्धात जगभरातील दहशतवादा विरोधात लढणारे देश नक्कीच भारताच्या पाठी उभे राहतील आणि या युध्दामुळे जगभरातून कायमचे दहशतवादी कारवायांचे सत्र संपुष्टात येईल.

**मीना देवल, डॉक्टर**

○ सध्या दहशतवादी हल्ल्यामुळे आपल्या देशवासीयांच्या भावना या तीव्र आहेत हे स्वाभाविक आहे मात्र या पार्श्वभूमीवर लागलीच युद्धाचा आग्रह मात्र तितकासा बरोबर नाही. सध्या जगभरातील देश हे जागतिक मंदीचे दुष्परिणाम भोगत आहेत याला आपला देश देखील अपवाद नाहीच. अशा परिस्थितीत आर्थिक दृष्टिकोनातून हे युद्ध आपल्याला परवडणारे नाही. याचा अर्थ आपली युद्धाची कुवत नाही असे नाही मात्र हि युद्धाची योग्य वेळ नाही. मुळात जगभरातील समविचारी देशांनी एकत्र येऊन या दहशतवादाचे समूळ उच्चाटन कसे होईल? याकडे लक्ष देऊन त्या दृष्टीने खंबीर कारवाया सुरु करायला हव्यात असं वाटते. ■ ■

## जीप इंडियाची रँग्लर विलीज '४१ स्पेशल एडिशन सादर

आपल्या ऐतिहासिक भूतकाळाला एक शक्तिशाली मान्यता देत, जीप इंडियाने रँग्लर विलीज '४१ स्पेशल एडिशन सादर केले आहे, ही मर्यादित-चालणारी कलेक्टर आवृत्ती आहे जी मूळ १९४१ विलीजच्या निर्विवाद भावनेला आजच्या रँग्लरच्या मजबूत क्षमता आणि प्रीमियम नावीन्यपूर्णतेसह एकत्र करते.



संपूर्ण भारतात फक्त ३० युनिट्स उपलब्ध असल्याने, ही एक्सक्लुझिव्ह एडिशन ऑफ-रोडर्स आणि जीप शुद्धता प्रेमींसाठी डिझाइन केलेली आहे जे वारसा, व्यक्तिमत्व आणि कामगिरीला महत्त्व देतात. विद्यमान रंगांव्यतिरिक्त, स्पेशल सिरीज एका नवीन ठळक ४१ ग्रीन रंगात ऑफर केली आहे, जी केवळ या आवृत्तीसह उपलब्ध आहे, रँग्लर विलीज '४१ त्याच्या खास १९४१ हूड डेकल आणि लष्करी-प्रेरित सौंदर्याने त्वरित ओळखली जाते. या लाँचमुळे भारतात '४१ ग्रीन पेंट पयार्याचा पदार्पण देखील झाला आहे, जो त्याची अद्वितीय ओळख जपण्यासाठी केवळ विलीज आवृत्तीसाठी राखीव आहे.

वेगळे दिसण्यासाठी बनवलेले, रँग्लर विलीज '४१ स्पेशल एडिशन त्याच्या अद्वितीय १९४१ हुड डेकल आणि त्याच्या लष्करी उत्पत्तीची आठवण करून देणारा एक विशेष विलीज '४१ हिरवा रंग द्वारे वेगळे आहे. आधुनिक काळातील आयकॉनकडून अपेक्षित आराम आणि नावीन्यपूर्णता स्वीकारताना, जीपच्या युद्धकाळातील वारशाचे कौतुक करते. या मर्यादित आवृत्तीच्या मॉडेलमध्ये पॉवर साइड स्टेप्स, ग्रॅब हँडल्स, फ्लोअर मॅट्स, १९४१ हुड डेकल आणि अतिरिक्त उपयुक्तता आणि सुरक्षिततेसाठी फ्रंट आणि रीअर डॅश कॅम्ससह मजबूत आणि कार्यात्मक सुधारणांचा संच आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## नक्षलवाद्याला अटक

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ६ :

शहरी भागात माओवादी विचारधारेचा प्रसार करण्यात गुंतलेला प्रशांत कांबळे ऊर्फ लॅपटॉप याला राज्य दहशतवादविरोधी पथकाने पिंपरी-चिंचवड परिसरातील चऱ्होली भागातून अटक केली. ठाणे येथे दाखल झालेल्या गंभीर गुन्ह्यात तो गेले १५ वर्षे फरार होता, असे पोलिसांनी सांगितले.

# आरोग्यसेवेचा आदर्श अधिक वृद्धिंगत करा

डॉ. आरती सरीन यांचे आवाहन : दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाचा १६ वा दीक्षान्त समारोह




डॉ. प्रीती अदानी, डॉ. बोरले, डॉ. दातारकर यांना डीएस्सी सन्मान

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ६ :

तुम्ही या नवीन भारताचे शिल्पकार असून स्वावलंबी, सर्वसमावेशक आणि नवोन्मेषशाली राष्ट्राच्या उभारणीत केंद्रस्थानी आहात. भविष्यातील आरोग्यसेवेचा आदर्श तुमच्या विद्यापीठाने आधीच निर्माण केला आहे. आता जागतिक दृष्टिकोन आणि मानवतेशी सुसंगत तंत्रज्ञान स्वीकारत हा आदर्श अधिक वृद्धिंगत करण्याची जबाबदारी तुमच्या खांद्यावर आहे, असे उद्गार भारताच्या सर्जन व्हाइस ॲडमिरल तथा सशस्त्र दल वैद्यकीय सेवेच्या महासंचालक डॉ. आरती सरीन यांनी सावंगी मेघे येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाच्या सोळाव्या दीक्षान्त समारोहात काढले. या समारोहाला अदानी फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. प्रीती अदानी यांची विशेष उपस्थिती होती. समारोहात विद्यापीठाचे कुलपती दत्ता मेघे यांनी स्नातक व स्नातकोत्तर विद्यार्थ्यांना आरोग्यसेवेची दीक्षा दिली.

समारोहात प्रारंभी डॉ. प्रीती अदानी, दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजीव बोरले आणि नागपूरच्या शासकीय दंत महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अभय दातारकर यांना डॉक्टर ऑफ सायन्स या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले.

या विद्यापीठाने आणि तुमच्या पालकांनी तुमच्यामध्ये जी मूल्ये रुजवली आहेत ती पुढील वाटचालीसाठी खरी दिशादर्शक आहेत. जग चांगले बनवण्यासाठी आपल्या कौशल्याचा वापर करा. तुम्ही या विद्यापीठातून मिळविलेल्या ज्ञानाची, कौशल्यांची, करुणेची आणि इतरांच्या भवितव्याला आकार देण्यासाठी कटीबद्ध होण्याची आज जगाला गरज आहे, असे मनोगत डॉ. प्रीती अदानी मांडले. डॉ. राजीव बोरले व डॉ. अभय दातारकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

दीक्षान्त समारोहाला कुलगुरू डॉ. ललित वाघमारे, प्रधान सल्लागार सागर मेघे, प्रकुलगुरू डॉ. गौरव मिश्रा, व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. मंदार साने, आरती कुलकर्णी, अनिल पारेख, कार्यकारी संचालक डॉ. अनुप मरार, मुख्य समन्वयक डॉ. एस. एस. पटेल, डॉ. संदीप श्रीवास्तव, डॉ. तृप्ती वाघमारे, डॉ. जहीर काझी, कुलसचिव डॉ. श्वेता पिसूळकर, रवि मेघे, परीक्षा नियंत्रक डॉ. सुनीता वाघ, डॉ. अलका रावेकर, ब्रजेश लोहिया, डॉ. पंकज अनावडे, सुकेशिनी लोटे, डॉ. दीपक खोब्रागडे, डॉ. उत्कर्षा पाचरणे, डॉ. रघुवीर रघुमहंती, डॉ. पल्लवी डायगव्हाणे, डॉ. शुभदा गाडे, डॉ. पूजा कस्तूरकर, डॉ. अनिता वंजारी, डॉ. विद्या लोहे, डॉ. सुप्रिया नरड यांची प्रमुख उपस्थिती होती.

जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील भाग २ची विद्यार्थिनी अंकिता ठाकूर हिला सर्वाधिक १२ सुवर्णपदकांसह एकूण १५ पुरस्कारांनी गौरविण्यात आले. इशा सहाय या वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थिनीला ८ सुवर्णपदकांसह एकूण १० पुरस्कार प्राप्त झाले. यासोबतच, स्नातकोत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी डॉ. निखिल पंतबालेकुंद्री याला ७ सुवर्णपदके तर डॉ. सिमरन चौहान हिला ४ सुवर्णपदके प्राप्त झालीत. शरद पवार दंत महाविद्यालयातील गौरव हेमनानी याला ४ सुवर्णपदके, महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालयाची साक्षी कृष्णा मुटे हिला ३ सुवर्णपदके, एक रौप्य पदक आणि ३ शिष्यवृत्ती पुरस्कार प्राप्त झालेत. समारोहात विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षांमध्ये गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या एकूण ८१ विद्यार्थ्यांना ११९ सुवर्ण, ६ रौप्य तर १२ कुलपती शिष्यवृत्ती पुरस्कार प्रदान करण्यात आलेत.

दीक्षान्त समारोहात वैद्यकीय शाखेतील २३२ स्नातक व १६३ स्नातकोत्तर, दंतविज्ञान शाखेतील ८१ स्नातक व ३४ स्नातकोत्तर, आयुर्वेद शाखेतील ५९ स्नातक व ३९ स्नातकोत्तर, भौतिकोपचार शाखेतील ५५ स्नातक व २२ स्नातकोत्तर, नर्सिंग शाखेतील ८० स्नातक, २७ स्नातकोत्तर व पदविका १०, याशिवाय औषध निर्माणशास्त्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, परावैद्यकीय शाखा आणि अन्य विद्याशाखेतील अशा एकूण १,७२४ विद्यार्थ्यांना दीक्षा देण्यात आली. यावेळी, ७३ पीएचडीप्राप्त आणि ३८ फेलोशिपप्राप्त विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

संचालन डॉ. समर्थ शुक्ल व डॉ. प्रमिता घरडे मुनतोडे यांनी केले. समारोहाची सांगता मृणाल मुळे यांच्या पसायदान व राष्ट्रगीताने करण्यात आली. समारंभाला मोठी उपस्थिती होती.